म.ग्रं.सं. ठाणे
विषय : निबंध
सं. क्र. : २०४६

REFBK-0013778
REFBK-0013778

# पंचायत राज्याकडे वाटचाल

१५४३
निबंध
६४९०८
९५।३।६९
२०४६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम ६४९०८ वि: निबंध
क्रमांक २०४६ नों दि: ९५।३।६९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ९३६६८
संदर्भ : ग्रंथ

REFBK-0013778

माधवराव कृष्णराव कोकाटे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

जोशी-लोखंडे प्रकाशन, टिळक रस्ता, पुणे २.

प्रकाशक

दे. श्री. जोशी व म. द. लोखंडे
जोशी आणि लोखंडे प्रकाशन,
सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे २

卐 卐 卐

प्रथमावृत्ती १९६४

प्रकाशन दि. ४-१२-१९६४

किंमत एक रुपया पंच्याहत्तर पैसे

卐 卐 卐

मुद्रक

प्र. भा. काळे,
प्रतिभा मुद्रणालय,
सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थकुम
अनुक्रम ५४६०८ दि: ...
क्रमांक २०४५ नों. दि: १५/३/६९

# निवेदन

★

" पाचांमुखी परमेश्वर ". पाच माणसांना एखादी गोष्ट पटली आणि सर्वांचे त्यावर एकमत झाले म्हणजे ती गोष्ट परमेश्वराला आवडली. त्याच्याच इच्छेने व त्यानेच सर्व पाचांना एकच प्रेरणा दिल्यामुळे त्यांच्या तोंडून ती गोष्ट बाहेर पडली. म्हणजे ती परमेश्वराचे तोंडूनच बाहेर पडली असे मानण्याची प्रथा समाजात फार पूर्वीपासून पडली आहे, व ही म्हण प्रचारात आली. पाच यावरून पंच, पंचांचा समूह म्हणजे पंचायत. पंचायतीचे राज्य म्हणजे ग्रामराज्य. आपण भारतीय लोक ज्यांना राष्ट्रपिता मानतो ते परमपूज्य महात्मा गांधी यांची ग्रामराज्याची कल्पना होती. ग्रामराज्यातून रामराज्य निर्माण व्हावे आणि केवळ भारतीय जनताच नव्हे, तर अखिल मानवजात सुखी व संपन्न व्हावी आणि जगात गुण्यगोविंदाने नांदावी अशी महात्माजींची प्रबळ इच्छा होती. त्यासाठी ते आयुष्यभर झगडले. आपले स्वप्न साकार व्हावे म्हणून हयातभर त्यांनी काबाडकष्ट उपसले व धारातीर्थी पडले. त्यांचे अनुयायी म्हणविणारे काँग्रेसजन. ते अधिकारावर आल्यावर त्यांनी हळूहळू आपल्या राष्ट्रपित्याच्या स्वप्नाला आकार देण्याचा प्रयत्न चालविला आणि त्या प्रयत्नांतून हे पंचायतराज्य निर्माण झाले आहे.



भावना कितीतरी उदात्त! पण त्याला कायद्याच्या चाकोरीत बसवून शासनव्यवस्थेत आणताना फार कठीण काम आहे. याचा प्रत्यय आता येऊ लागला आहे. राज्यकर्त्यांनी निर्धाराने पाऊल उचलले. पण जनतेतील लोक-

शाहीच्या धारणेप्रमाणे ज्या मंडळींना पंचायतराज्यात सत्तालाभ झाला, त्या सत्तेचा गेली दोन वर्षे ते जो महाराष्ट्रात वापर करीत आहेत, त्याकडे पाहिले म्हणजे केवढा मोठा उन्माद या मंडळीना झाला आहे, याचा हरघडी अनुभव येत आहे. आज काय झाले? तर अमुक अमुक गावच्या प्राथमिक शाळेच्या हेडमास्तरला सरपंचांनी व स्कूल पंचसमितीच्या चेअरमननी चपलाने मारले. कारण काय? तर त्या शिक्षकाने वयाचा खोटा दाखला दिला नाही. उद्या काय झाले! तर गावगुंडांनी उत्कृष्ट शिक्षण व समाजकार्य करणाऱ्या शिक्षकाला काठीने मारले. कारण काय? तर त्या शाळेतील शिक्षिकेला त्यांनी संरक्षण दिले. तिच्या अब्रूवर घाला घालण्याची संधी त्या शिक्षकाने गुंडांना मिळू दिली नाही. परवा काय झाले? तर प्रॅक्टिसिंग स्कूलचे पाठ पाहणाऱ्या प्राध्यापकावर गुंडाने शाळेत जाऊन शिक्षक आणि मुले यांच्यादेखत हात टाकला. असे एक ना अनेक प्रकार शिक्षणासारख्या समाज सुसंस्कृत बनविणाऱ्या खात्यात घडत आहेत.

हीच अवस्था थोड्याफार फरकाने सहकार, शेती इत्यादी खात्यांत घडत आहे. सहकार खात्यात स्वाहाकार अनेक मार्गांनी चालू आहे. वाटपात काळा-बाजार व कमिशन एजन्सीज. निवडणुकीत लाचलुचपत व पळवापळवी. खोटे दस्तऐवज, निवडून येण्यासाठी खोट्या तारखा बदलून नोटिसांची फिरवाफिरव. शेतीसाठी आलेले खत गोडाऊनमध्ये पडून राहते. हंगाम संपल्यावर वाटणीची घाई होते. मग शेतकरी घेत नाही. उत्पादन वाढले पाहिजे! कसे वाढणार? हे सर्व पाहिले म्हणजे सर्वसामान्य जनता असे उद्‌गार काढते की, या स्वराज्यात जनतेचे काय काय धिंडवडे निघतात कोणास ठाऊक!

ही परिस्थिती पाहून महाराष्ट्रातील पंचायतराज्याचे जनक ना. यशवन्त-रावजी चव्हाण यांना पत्रद्वारे हे आपले अपत्य कशा तऱ्हेने वाढत आहे? अशाने हे कसे बाळसे धरील? अशी विचारणा मी केली होती. चालू परि-स्थितीचे सत्यचित्र त्यांच्यापुढे उभे केले. ( ना. यशवन्तराव यांचे त्यावरील उत्तर वेगळ्या पानावर सोबत दिले आहे. )

आपल्या महाराष्ट्राचे थोर नेते व भारत देशाचे संरक्षणमंत्री ना. यशवन्त-रावजी यांनी दिलेल्या उत्तराने एक प्रकारचा धीर आला आणि जी खळबळ अन्तःकरणात गेली दोन वर्षे कोंडून राहिली होती, ती समाजापुढे उघडी करून मोकळा झालो.

हे करीत असताना केवळ दोष न दाखविता, केवळ कसे चालले आहे हे न दाखवता काय केले पाहिजे, हेही सुचविण्याचा होईल तितका प्रयत्न मी केला

आहे. आता त्याची खरी पारख करणारा जनताजनार्दन आहे आणि 'जनतारूपी जनार्दन तोची माझा नारायण' अशी धारणा असलेल्या माझ्यासारख्या सामान्यजनाने त्या नारायणाखेरीज कोणाच्या पारखेची अपेक्षा करावी ?

"पंचायत राज्याकडे वाटचाल" हे पुस्तक तयार करण्यापूर्वी सांगलीतील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. पी. बी. पाटील आणि सहकारतज्ज्ञ श्री. गुलाबराव पाटील यांच्याशी गप्पा मारताना त्यांनी जे उत्तेजन दिले त्याबद्दल त्यांचे आणि पुस्तक-प्रकाशनाचे कार्य पुण्याचे लोकप्रिय प्रकाशक जोशी-लोखंडे यांनी एकदम पत्करून अगदी अल्पावधीत ते जनतेपुढे आणण्याची संधी देऊन मला प्रकाशात आणले, याबद्दल त्यांचे अन्तःकरणपूर्वक आभार मानणे माझे कर्तव्य आहे म्हणून त्यांचे आभार मानून माझे हे निवेदन संपवतो.

वसंत कॉलनी,
सांगली.
ता. ३०-११-१९६४

मा. कृ. कोकाटे

—



स. न. वि. वि.—

आपले दिनांक १० ऑक्टोबरचे पत्र मिळाले. पत्राचे उत्तर पाठविण्यास मला उशीर झाला याबद्दल क्षमस्व. आपण शैक्षणिक व सहकारी क्षेत्रांतील परिस्थितीचे भेदक वर्णन दिले आहे. त्या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रमुख लोकांना चिंता वाटावी असेच हे चित्र वाटते. मी प्रमुख मंडळींशी याबाबत जरूर चर्चा करीन. निव्वळ माझ्या चर्चेने हे सर्व सुधारेल असे मला वाटत नाही. या बाबतीत नित्य तेथे राहणाऱ्या मंडळींनी अधिक काळजीने पाहिले पाहिजे आणि शेवटी तुम्ही म्हणता तेच खरे आहे. आपले हातून होईल ते काम करीत रहावे, निराश न होता बोलत रहावे, करीत रहावे, लिहीत रहावे. त्यातून जे घडेल ते घडेल. मी आपणांस सांगू इच्छितो की, मी मात्र स्वतः निराश नाही. सत्तेचा पहिला उन्मेष आहे. विचारांती त्यावर अंकुश टाकता येतील असे मला जरूर वाटते. आपण मोकळेपणाने व निर्भीडपणाने पत्र लिहिले याबद्दल आभार. कळावे ही विनंती.

आपला

**यशवन्तराव चव्हाण**

## प्रस्तावना

★

महाराष्ट्राने पंचायत राज्याचे पाऊल टाकून दोन वर्षे झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांचे पुनरुज्जीवन, समाजविकासात समाज जागा करण्याचा महान प्रयत्न, लोकशाहीचे विकेंद्रीकरण, नवे नेतृत्व उभे करण्याचा खास उपाय वगैरे आशा-आकांक्षा मनात धरून सर्व देशाबरोबर महाराष्ट्रानेही हे पाऊल उचलले आणि ग्रामीण महाराष्ट्रात एक नवा प्रयोग सुरू झाला.

सुरुवातीच्या स्वागताची आणि उत्साहाची भरती ओसरू लागल्यानंतर प्रथम अडचणींचे खडक दिसू लागले आहेत. पंचायत राज्याचे हे नवे तारू या खडकांमधून निर्विघ्नपणे कसे पार पडेल याचा विचार आता करण्याची अत्यंत गरज आहे. "प्रारंभशूरः दाक्षिणात्यः" या म्हणीप्रमाणे पंचायत राज्याचा प्रारंभ करून तरी आम्ही राहिलो आहोत. परंतु त्यानंतर या उपक्रमाकडे जेवढे लक्ष द्यायला हवे होते तेवढे आम्ही देऊ शकलो नाही. चीनचे भयानक आक्रमण, पंडित नेहरूंचा दुःखदायक अंत, भाववाढीचे तापदायक संकट अशी प्रचंड कारणे यामागे आहेत. तरीसुद्धा या उपक्रमाकडे आता दोन वर्षांच्या अनुभवानंतर तरी पुरेसे लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे.



पी. बी. पाटील

ग्रामीण भागात प्रथम एक जागृत शिक्षक आणि खराखुरा समाजसेवक व नंतर असि. डेप्युटी एज्यु० इन्स्पेक्टर म्हणून ज्यांनी गेली चाळीस वर्षे काम करून आपले सर्व आयुष्य घालविले आहे असे श्री. माधवराव कृष्णराव कोकाटे यांनी या उपक्रमाबद्दलच्या स्वतःच्या प्रतिक्रिया या पुस्तकात व्यक्त केल्या आहेत. आपल्या देशातील प्रमुख घटक गाव हा आहे. चांगल्या-वाईट रूढी, परंपरा, जातीपाती, बाराबलुती इत्यादी चौकटीत बसून आतापर्यंत गावगाडा चालत

आला. त्या गावगाड्यातून अज्ञान, गरिबी, पिळवणूक, विषमता याच गोष्टी मुख्यतः जन्माला आल्या. ही व्यवस्था बदलून ज्ञानविज्ञान व संघटना यांच्या सामर्थ्यावर भौतिक समृद्धता गाठावी. न्याय, समता व स्वातंत्र्य उपभोगणारे नवे गाव उभे रहावे म्हणून पंचायत राज्याचा उपक्रम सुरू झाला. राजकीय, सामाजिक व आर्थिक अभिसरण समाजात झपाट्याने सुरू व्हावे अशी मुख्य अपेक्षा पंचायत राज्यात आहे.

श्री. कोकाटे यांनी आपल्या परखड निरीक्षणातून गावाचा जुना ढाचा तपासला आहे. त्याचप्रमाणे पंचायत राज्याच्या उपक्रमाचीही छाननी केली आहे. राजकीय स्वातंत्र्यानंतर आर्थिक व सामाजिक पिळवणूक थांबली पाहिजे, ही त्यांची पंचायत राज्याकडून अपेक्षा आहे व ती रास्त आहे. पंचायत राज्याचा उपक्रम हा जुन्या समाजात राहूनच चालावयाचा आहे. अशा वेळी नवा ढाचा निर्माण करून नवसमाजनिर्मिती करावयास आलेले पंचायत राज्य जुन्या ढाच्यातच अडकून पडण्याचा धोका त्यांनी स्पष्टपणे दाखविला आहे. पंचायत राज्याला ग्रामीण समाजात कोठून कसा धोका पोचण्याचा संभव आहे, हे त्यांनी आपल्या जिल्ह्याच्या व राज्याच्या निरीक्षणातून निर्भीडपणे मांडले आहे. परंतु केवळ टीका करूनच ते थांबलेले नाहीत. वैफल्यातून अगर निराशेतून त्यांनी हे पुस्तक लिहिले नाही. पंचायत राज्यावर त्यांचा विश्वास आहे आणि ते यशस्वी व्हावे अशी त्यांची मनोभन इच्छा आहे. म्हणून गावच्या गरजा जाणून त्या भागविण्यासाठी पंचायतीने काय केले पाहिजे व पंचायत राज्याच्या क्षेत्रातील विषयांची घडणजडण कशी असली पाहिजे याचे सविस्तर विवेचनही त्यांनी केले आहे.

पंचायत राज्य सुरू झाल्यापासून ग्रामपंचायत, तालुका पंचायत समिति व जिल्हा परिषद या संस्थांतून अनेक नवे कार्यकर्ते निवडून आले आहेत. त्यांच्याजवळ भरपूर उत्साह आहे आणि नवीन जाणून घेण्याची मोठी जिज्ञासाही आहे, असा आम्हांला आमच्या पंचायत राज्य शिक्षण-केंद्रात अनुभव आहे. त्यांची ही गरज या पुस्तिकेत निश्चित भागेल. पंचायत राज्यात काम करणाऱ्या सरपंच, उपसरपंच, पंच, पंचायत समिती सभासद यांनी ही पुस्तिका वाचून यात केलेल्या सूचनांप्रमाणे आपली पंचायत चालविली व या ठिकाणी सुचविलेल्या सूचनांपैकी निदान काही कामे आपापल्या गावात घडविली, तर पंचायत राज्याचा हेतू साध्य करण्यात त्यांनी फार मोठा हातभार लावला असे होईल आणि “**पांचामुखी परमेश्वर**” या म्हणीप्रमाणे पंचायत राज्य हे परमेश्वराचे राज्य म्हणजेच रामराज्य निर्माण होईल यात शंका वाटत नाही व ते व्हावे हाच लेखकाचा हेतू आहे.

पंचायत राज्यातील कार्यकर्त्यांप्रमाणेच सहकार, शिक्षण, समाजविकास इत्यादी क्षेत्रांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही या पुस्तकाचा निश्चित उपयोग होईल.

श्री. कोकाटे यांनी हयातभर सत्यशोधक, अस्पृश्यतानिवारण, शिक्षण, सहकार इत्यादि विविध क्षेत्रांत आणि चळवळीत प्रत्यक्ष काम केले आहे. पेन्शन घेतल्यानंतरही सेवकाचा त्यांचा पिंड त्यांना स्वस्थ बसू देत नाही. ग्रामीण भागातील सुखदुःखांचा त्यांचा गेल्या चाळीस वर्षांचा अनुभव त्यांच्यामागे आहे. त्यांनी निरनिराळ्या विषयांवर वेळोवेळा अनेक लेख लिहिले आहेत. त्या लेखनद्वारा व व्याख्यानद्वारा समाजजागृतीचेही काम केले आहे आणि त्या अनुभवातून अत्यंत जिव्हाळ्याने त्यांनी हे पुस्तक लिहिले आहे. याची प्रचीती पुस्तक वाचीत असताना ठिकठिकाणी येते.

ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनाशी अत्यंत निगडित असलेल्या पंचायत राज्यासंबंधी त्यांनी ही पुस्तिका तयार केली आणि त्यातल्या त्यात त्यांच्या कल्पनेप्रमाणे ज्यांनी आपल्या ग्रामपंचायती चालविल्या असून आपल्या गावांचा विकास साधला आहे अशा सांगली जिल्ह्यातील सलगरे आणि बावची या ग्रामपंचायतींचा आदर्शही या पुस्तिकेत त्यांनी लोकांपुढे ठेवला आहे. याबद्दल त्यांचे आभारच मानले पाहिजेत.

महाराष्ट्रातले मोठमोठे बुद्धिमंत वैफल्याने असो अगर इतर काही कारणाने असो, पण अजून ग्रामीण जनतेकडे तोंड करून उभे रहायला तयार नाहीत. अशा वेळी श्री. माधवराव कोकाटे यांनी "पंचायत राज्याकडे वाटचाल" हे पुस्तक लिहून केलेला हा उपक्रम निश्चितपणे प्रेरणा देणारा म्हणूनच स्तुत्य वाटतो आणि याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सांगली
दि. ३१-१०-६४

पी. बी. पाटील,
संचालक,
पंचायत राज्य शिक्षणकेंद्र, सांगली.

आला. त्या गावगाड्यातून अज्ञान, गरिबी, पिळवणूक, विषमता याच गोष्टी मुख्यतः जन्माला आल्या. ही व्यवस्था बदलून ज्ञानविज्ञान व संघटना यांच्या सामर्थ्यांवर भौतिक समृद्धता गाठावी. न्याय, समता व स्वातंत्र्य उपभोगणारे नवे गाव उभे रहावे म्हणून पंचायत राज्याचा उपक्रम सुरू झाला. राजकीय, सामाजिक व आर्थिक अभिसरण समाजात झपाट्याने सुरू व्हावे अशी मुख्य अपेक्षा पंचायत राज्यात आहे.

श्री. कोकाटे यांनी आपल्या परखड निरीक्षणातून गावाचा जुना ढाचा तपासला आहे. त्याचप्रमाणे पंचायत राज्याच्या उपक्रमाचीही छाननी केली आहे. राजकीय स्वातंत्र्यानंतर आर्थिक व सामाजिक पिळवणूक थांबली पाहिजे, ही त्यांची पंचायत राज्याकडून अपेक्षा आहे व ती रास्त आहे. पंचायत राज्याचा उपक्रम हा जुन्या समाजात राहूनच चालवयाचा आहे. अशा वेळी नवा ढाचा निर्माण करून नवसमाजनिर्मिती करावयास आलेले पंचायत राज्य जुन्या ढाच्यातच अडकून पडण्याचा धोका त्यांनी स्पष्टपणे दाखविला आहे. पंचायत राज्याला ग्रामीण समाजात कोठून कसा धोका पोचण्याचा संभव आहे, हे त्यांनी आपल्या जिल्ह्याच्या व राज्याच्या निरीक्षणातून निर्भीडपणे मांडले आहे. परंतु केवळ टीका करूनच ते थांबलेले नाहीत. वैफल्यातून अगर निराशेतून त्यांनी हे पुस्तक लिहिले नाही. पंचायत राज्यावर त्यांचा विश्वास आहे आणि ते यशस्वी व्हावे अशी त्यांची मनोमन इच्छा आहे. म्हणून गावच्या गरजा जाणून त्या भागविण्यासाठी पंचायतीने काय केले पाहिजे व पंचायत राज्याच्या क्षेत्रातील विषयांची घडणजडण कशी असली पाहिजे याचे सविस्तर विवेचनही त्यांनी केले आहे.

पंचायत राज्य सुरू झाल्यापासून ग्रामपंचायत, तालुका पंचायत समिती व जिल्हा परिषद या संस्थांतून अनेक नवे कार्यकर्ते निवडून आले आहेत. त्यांच्याजवळ भरपूर उत्साह आहे आणि नवीन जाणून घेण्याची मोठी जिज्ञासाही आहे, असा आम्हांला आमच्या पंचायत राज्य शिक्षण-केंद्रात अनुभव आहे. त्यांची ही गरज या पुस्तिकेत निश्चित भागेल. पंचायत राज्यात काम करणाऱ्या सरपंच, उपसरपंच, पंच, पंचायत समिती सभासद यांनी ही पुस्तिका वाचून यात केलेल्या सूचनांप्रमाणे आपली पंचायत चालविली व या ठिकाणी सुचविलेल्या सूचनांपैकी निदान काही कामे आपापल्या गावात घडविली, तर पंचायत राज्याचा हेतू साध्य करण्यात त्यांनी फार मोठा हातभार लावला असे होईल आणि **"पांचामुखी परमेश्वर"** या म्हणीप्रमाणे पंचायत राज्य हे परमेश्वराचे राज्य म्हणजेच रामराज्य निर्माण होईल यात शंका वाटत नाही व ते व्हावे हाच लेखकाचा हेतू आहे.

पंचायत राज्यातील कार्यकर्त्यांप्रमाणेच सहकार, शिक्षण, समाजविकास इत्यादी क्षेत्रांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही या पुस्तकाचा निश्चित उपयोग होईल.

श्री. कोकाटे यांनी हयातभर सत्यशोधक, अस्पृश्यतानिवारण, शिक्षण, सहकार इत्यादि विविध क्षेत्रांत आणि चळवळीत प्रत्यक्ष काम केले आहे. पेन्शन घेतल्यानंतरही सेवकाचा त्यांचा पिंड त्यांना स्वस्थ बसू देत नाही. ग्रामीण भागातील सुखदुःखांचा त्यांचा गेल्या चाळीस वर्षांचा अनुभव त्यांच्यामागे आहे. त्यांनी निरनिराळ्या विषयांवर वेळोवेळा अनेक लेख लिहिले आहेत. त्या लेखनद्वारा व व्याख्यानद्वारा समाजजागृतीचेही काम केले आहे आणि त्या अनुभवातून अत्यंत जिव्हाळ्याने त्यांनी हे पुस्तक लिहिले आहे. याची प्रचीती पुस्तक वाचीत असताना ठिकठिकाणी येते.

ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनाशी अत्यंत निगडित असलेल्या पंचायत राज्यासंबंधी त्यांनी ही पुस्तिका तयार केली आणि त्यातल्या त्यात त्यांच्या कल्पनेप्रमाणे ज्यांनी आपल्या ग्रामपंचायती चालविल्या असून आपल्या गावांचा विकास साधला आहे अशा सांगली जिल्ह्यातील सलगरे आणि बावची या ग्रामपंचायतींचा आदर्शही या पुस्तिकेत त्यांनी लोकांपुढे ठेवला आहे. याबद्दल त्यांचे आभारच मानले पाहिजेत.

महाराष्ट्रातले मोठमोठे बुद्धिमंत वैफल्याने असो अगर इतर काही कारणाने असो, पण अजून ग्रामीण जनतेकडे तोंड करून उभे रहायला तयार नाहीत. अशा वेळी श्री. माधवराव कोकाटे यांनी "पंचायत राज्याकडे वाटचाल" हे पुस्तक लिहून केलेला हा उपक्रम निश्चितपणे प्रेरणा देणारा म्हणूनच स्तुत्य वाटतो आणि याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सांगली
दि. ३१-१०-६४

पी. बी. पाटील,
संचालक,
पंचायत राज्य शिक्षणकेंद्र, सांगली.

## अनुक्रम :

卐


निवेदन

प्रस्तावना

मा. यशवंतराव चव्हाण यांचे लेखकास पत्र

अर्पणपत्रिका

| | | |
|---|---|---|
| (१) | गावगाडा | १ |
| (२) | गावगाड्याचे बळी | ४ |
| (३) | मोठेपणाची कल्पना | ९ |
| (४) | ग्रामसुधारणा | १५ |
| (५) | आरोग्य | १९ |
| (६) | बांधकाम | २२ |
| (७) | शेती | २४ |
| (८) | सहकार | २७ |
| (९) | उद्योगधंदे | ३१ |
| (१०) | समाजकल्याण | ३३ |
| (११) | विकासाच्या छायेतील सलगरे | ३६ |
| (१२) | विकासयुगात कायापालट झालेले बावची | ४९ |


● ● ●



पंचायत राज्याचा आत्मा सहकार यात ज्यांनी आपले अंत:करण ओतून बहुजन समाजाचे हितासाठी सहकार क्षेत्रास सर्वस्वी वाहून घेतले, अमेरिकन सरकारचे पाहुणे म्हणून सहकार क्षेत्राचा विशेष अभ्यास करण्याचा ज्यांना सुयोग लाभला त्या

**माननीय दे. भ. गुलाबराव पाटील**

यांना आदरपूर्वक अर्पण.

— लेखक

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र निबंध
अनुक्रम ८४८०८ वि:
नोंद क्र. २०२६४ नोंद दि. २५।३।६७

# पंचायत राज्याकडे वाटचाल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७३५६८

## १. गावगाडा

पूर्वीच्या ग्रामव्यवस्थेत सोयीसाठी म्हणून गावाची निरनिराळी कामे करण्यासाठी निरनिराळे कामगार नेमलेले असत. त्या कामाबद्दल त्यांना पगार देणे त्या काळात शक्य नव्हते. म्हणून त्या वेळच्या सरकारने त्यांना जमिनी दिल्या व त्या जमिनीला 'वतन इनाम' असे संबोधण्यात आले. उदाहरणार्थ, पाटील वतन इनाम, कुलकर्णी वतन इनाम, चौगुले वतन इनाम इत्यादि आणि या जमिनीचा पूर्ण सारा वसूल न करता सरकार या वतनदारांकडून साऱ्याची चौथाई घेत असे. गावच्या व्यवस्थेतील शेवटचा घटक जो महार, त्यालासुद्धा इनाम जमिनी दिल्या होत्या आणि या लोकांची कामेही वाटलेली होती. पाटलाने गावात शांतता व सुव्यवस्था राखणे आणि शेतसारा वसूल करणे; कुलकर्ण्याने गावचे दप्तर सांभाळणे व लिहिण्याचे आणि जमाबंदीचे काम करणे; चौगुल्याने पाटील व कुलकर्णी यांच्या हाताखाली चावडीत शिपायासारखे काम करणे, दप्तर नेणे-आणणे; महाराने तालुक्यात व इतरत्र निरोप पोचविणे, कुळे बोलावणे आणि पाटील व कुलकर्णी हे सांगतील ती हलकीसलकी कामे करणे. थोडक्यात महार हा पाटील-कुलकर्ण्यांचा हरकाम्या होता.

### वंशपरंपरेने प्रतिष्ठा

पाटील-कुलकर्णी वगैरे गावकामगारांकडे वंशपरंपरा वतने राहिली. यामुळे पाटलाचा मुलगा पाटील, कुलकर्ण्याचा मुलगा कुलकर्णी, चौगुल्याचा मुलगा

चौगुला आणि महाराचा मुलगा महार असे चालू राहिले. पुढे पाटलाला चार मुलगे असले तर एक मुलगा पाटील म्हणून काम करत असे. अर्थात् बाकीचे तिघे काही पाटील नव्हते. पण तेही स्वतःला पाटीलच म्हणवून घेऊ लागले आणि अशा रीतीने सर्वजण पाटील नाव लावू लागले. ही एक जातच निर्माण झाली. असेच इतर कामगारांचेही झाले. या गावकामगारांच्या भाऊबंदांनी आपसात भाऊबंदकी केली व कामासाठी दिलेल्या जमिनीची विभागणी करून घेतली.

इनाम जमिनी वाटून घेतल्या पण काम काही वाटणे शक्य नव्हते. पाटलाच्या कामाचे दोन विभाग होऊन शांतता व सुव्यवस्था राखणारा तो पोलीस पाटील आणि महसूल (शेतसारा वगैरे) गोळा करणारा तो मुलकी पाटील असे दोन पाटील काम करू लागले. लहान गावात ही दोन्ही कामे एकाच पाटलाकडे असत. सत्ता हाती असल्यामुळे या पाटील वर्गाला खेडेगावात प्रतिष्ठा प्राप्त झाली. इतर कामगारांतही जमिनीची वाटणी झाली. जमीन पाहिजे तर काम कर. अर्थात् कामाचीही वाटणी झाली. कोठे एक वर्ष एकाने–दुसरे वर्ष दुसऱ्याने, तर कोठे पाच वर्षे एकाने, दुसरी पाच वर्षे दुसऱ्याने याप्रमाणे पाळीने काम पाहू लागले व कामाच्या महत्त्वाप्रमाणे त्यांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. विशेषतः पाटील व कुलकर्णी यांना फारच महत्त्व प्राप्त झाले.

## अधिकाराचा गैरवापर

पाटलाप्रमाणेच कुलकर्ण्यांकडे गावच्या सर्व जमिनीचे रेकॉर्ड रंगविण्याचे, लिखाईचे महत्त्वाचे काम असल्यामुळे त्याने आपली लेखणी कैक वेळा लोकांचे भलेबुरे करण्यासाठी वापरली. पाटील व कुलकर्णी यांनी एकमेकांना सामील होऊन लाचलुचपत करण्यास सुरुवात केली आणि हे दोन गावचे महत्त्वाचे घटकच गावची शांतता व सुव्यवस्था बिघडवू लागले. शिवाय सत्ता हाती असल्यामुळे गावातील इतर मंडळी या लोकांशी नम्रतेने व अजीजीने वागू लागली. यामुळे यांना गावात भलतीच प्रतिष्ठा लाभली. पाटील म्हणजे गावचा राजा आणि कुलकर्णी म्हणजे त्याचा प्रधानजी या तोऱ्यात ही मंडळी राहू लागली. ही प्रतिष्ठा मात्र चौगुला व वेसकर यांना येणे शक्य नव्हते व आलीही नाही. कारण त्यांची कामे हलकी होती.

## बलुतेदार

या गावकामगाराखेरीज गावात राहणाऱ्या मंडळींच्या नित्याच्या गरजा भागविण्यासाठी काही धंदेवाल्यांची गरज असे. खेड्यातील मुख्य व्यवसाय शेती

हा असल्यामुळे सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, परीट, गुरव, रामोशी, महार, मांग, तेली, तांबोळी इत्यादी मंडळींची गरज शेतकऱ्यांना सतत लागत असे. शेतकऱ्यांना या मंडळींना त्यांच्या कामाचा मोबदला देण्यास धान्याशिवाय काही नसे. या लोकांनी शेतकऱ्याचे काम वर्षभर जरूर लागेल तेव्हा करायचे व सुगीचे वेळी शेतकरी त्यांना धान्यरूपाने मोबदला देत असे. यालाच बलुते म्हणत व हे बलुते घेऊन काम करणारे गावचे १२ बलुतेदार म्हणजे गावाचे खरेखुरे सेवक. हे लोकच गावकऱ्यांची शान आणि मान राखीत. सर्व वेळी उपयोगी पडत. सुरुवातीस त्यांच्या कामाचे महत्त्व जाणून लोक त्यांना भरपूर मोबदलाही देत. यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असे. आजही काही खेड्यांत काही वर्ग आपापले धंदे करतात आणि बलुते घेतात. पण ही बलुतेदारांची संस्था आता मोडकळीस आली आहे.

## गावगाडा कोणी मोडला ?

बलुतेदारांची पद्धती मोडणे किंवा यांपैकी काही लोकांनी आपले धंदे सोडून देणे याला अनेक कारणे आहेत. त्यांपैकी महत्त्वाचे कारण गावातील स्वतःला प्रतिष्ठित किंवा मोठे समजणारे पाटील-कुलकर्णी इत्यादी होत. या पाटील-कुलकर्ण्यांखेरीज मुसलमानी अमदानीत ज्यांनी लष्करात नोकऱ्या केल्या, त्यांना त्या राज्यकर्त्यांनी कोणाला जहागिरी दिल्या, कोणाला गावे इनाम दिली, कोणाला आपल्या प्रदेशाचे मुख्य नेमले. तो जहागीरदार, इनामदार, देशमुख, इत्यादी वर्ग समाजात आला. हे लोक सरकारचे प्रतिनिधी म्हणून सामान्य लोक यांनाच सरकार म्हणू लागले. आर्थिक परिस्थिती चांगली यामुळे यांनाही समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली. सत्ता आणि संपत्ती ज्यांच्या हाती असते, त्यांना साहजिकच मोठेपणा प्राप्त होतो. त्याप्रमाणे हे सरकार म्हणवून घेणारे व पाटील आणि कुलकर्णी या सर्वच सत्ता-संपत्तिधारकांनी बलुतेदार वर्गाकडून फुकट काम करून घेण्यास सुरुवात केली. तसेच त्यांचा उल्लेखही त्यांच्या धंद्यावरून हे लोक तुच्छतेने करू लागले. पुष्कळ वेळा फुकट काम केल्यावर एकादे वेळी मोबदला मागितला तर या प्रतिष्ठितांनी त्या सेवकांचा उल्लेख सुतारडा, चांभारडा, लोहारडा, कुंभारडा, गुरवडा तसेच न्हावगंड, तेलगंड अशा प्रकारे करायचा व अर्वाच्य बोलून त्यांना दम ( धमकी ) द्यायचा आणि त्याप्रमाणे त्यांच्या अंगावर हात टाकण्यापासून त्यांच्या अब्रूवर घाला घालण्यापर्यंत सर्व कृत्ये करायची. त्यांची दाद कोठेच लागायची नाही. याचा परिणाम असा झाला की, या लोकांनी हळूहळू धंदे सोडले व काहींनी तर गावेही सोडली.

• • •

# २. गावगाड्याचे बळी

ज्यांच्या अरेरावीच्या वर्तनामुळे गावाची घडी विस्कटली, त्यांनाही त्याच खाईत जावे लागले. इंग्रजी अमदानीत शिक्षणाची सोय झाली. शिक्षणप्रसारामुळे सामान्य लोकांना आपल्या हक्कांची व माणुसकीची जाणीव हळूहळू होऊ लागली. स्वाभिमान जागृत झाला; आणि मानापमानाची तीव्रतेने जाणीव झाल्यामुळेच खेड्यातील बलुतेदारांनी आपले धंदे सोडून दिले. " मुकी बिचारी कुणीही हाका " ही परिस्थिती पालटली.

## पहिला कुलकर्णी

लोक बोलू लागले, लिहू लागले, आपले म्हणणे सरकारला कळवू लागले. अन्यायाविरुद्ध सभांच्या द्वाराही हाकाटी सुरू झाली. लोक दाद मागू लागले. त्यात कुलकर्ण्यांचा प्रथम बळी गेला. लोकांच्या मागण्यावरून कुलकर्णीवतने खालसा केली. वतनदार कुलकर्णी कामावरून खाली झाल्याबरोबर गावातील त्यांचे वजनही नष्ट झाले. सामाजिकदृष्ट्या ही फार चांगली गोष्ट झाली असे लोक मानू लागले. कारण या कुलकर्णी मंडळींनी लोकांना अगदी पिळून काढले होते. चांगले काही याला दिसले, की याची दृष्ट लागलीच ! पाच वर्षांची याची पाळी आली म्हणजे हा गावठी प्रधानजी आपली सत्ता इतक्या जुलमीपणाने वापरीत असे की, लाचलुचपत तर करायचीच, पण एखाद्याचे चांगले चालले असेल त्यात भांडणे लावायची आणि कोर्ट-दरबार करायला लावून त्यांना साफ बुडवायचे. या प्राण्याने खेडेगावात अनेकांना अक्षरशः धुळीला मिळवले. आपल्या पाळीत पाच वर्षांत एक वाडा बांधायचा, एक विहीर काढायची, त्यासाठी पीकपहाणी करताना शेलके झाड दिसले, की त्याची मागणी करायची. मालकाने ते झाड तोडून आणून याच्या दारात टाकले पाहिजे. नाही म्हणायची सोयच नाही. गोरगरीब आणि बायाबापड्या यांना अंतःकरणापासून शिव्या मोजीत असत. त्यांच्या आत्म्याचा तळतळाट लागला म्हणा अगर त्यांच्या पापाचा घडा भरला म्हणून म्हणा. जनता कंटाळली, जागृत झाली आणि त्यामुळे वर सांगितल्याप्रमाणे कुलकर्ण्यांचा बळी प्रथम गेला. गावकऱ्यांच्या डोक्यावरचा एक भार कमी झाला.

## तलाठी आला

तलाठ्याने कुलकर्ण्यांची जागा घेतली. गावचे दप्तर त्याच्या ताब्यात आले. पहिल्यापहिल्याने तलाठी परगावचा रहाणारा असल्यामुळे थोडे जपून

वागत असे. परंतु काम कुलकर्ण्याचेच आणि सत्ताही तीच यामुळे हळूहळू त्यानेही जनतेला चमत्कार दाखविण्यास सुरुवात केली. रीतसर एक आणा फी घेण्याच्या जागी तो रुपया घेऊ लागला आणि त्याच्याच बरोबर हक्काचे पत्रकात नोंदी करताना बिगर हक्कदारास हक्काचे सदरी व हक्कदारास बिगर हक्काचे ठिकाणी, ७।१२ त कूळ वहिवाटीचे जागी तर कित्येक चाकरीच्या गड्यांना कूळ बनवून मालकाला अक्षरशः बनविले आणि तक्रारी-रजिस्टरे भरून मामलेदार वगैरे वरिष्ठांनाही सतावून सोडले.

कुलकर्ण्यापेक्षा तलाठ्याला फक्त बदलीची भीती पण ती उलट तलाठ्याचे पथ्यावरच पडे. एका गावात रहावयाचे नसल्यामुळे त्या गावातील कोणाचा मुलाहिजा ठेवण्याचे त्यांना काहीच कारण नसे. उलट नव्या गावी जाऊन तेथील लोकांना लुबाडणे त्यांना सोपे जाऊ लागले.

## सरकार-इनामदार

भारताचा पोलादी पुरुष देशभक्त वल्लभभाई पटेल, भारताचे गृहमंत्री असताना त्यांनी लेखणीच्या फटकाऱ्यासरशी सर्व संस्थाने खालसा करून भारताच्या नकाशावरील पिवळे डाग पुसून टाकले. त्याचप्रमाणे सरदार-इनामदार यांच्या सरदाऱ्याही नष्ट केल्या. ते सर्वचजण सामान्य नागरिक झाले. पण राज्य गेले तरी **राजेसाहेब**, छत्रपती गेले तरी **छत्रपती**, देशमुख गेले तरी देशमुख आडनाव, पाटील आडनाव, कुलकर्णी आडनाव राहिले. म्हणतात ना "काप गेले पण भोके राहिली." आता या भोकांच्या जिवावर आणि यांच्याकडे असलेल्या वाजवीपेक्षा अधिक जमिनीच्या जिवावर हे लोक सामान्य गरीब लोकांवर गुरगुरतात व खेड्यांचे स्वास्थ्य घालवितात.

## उपाय होणे जरूर

स्वतंत्र राष्ट्र आणि लोकशाही सरकार या देशात असताना दुसऱ्या कोणाला छत्रपती, राजेसाहेब, सरकार इ० म्हणून घेण्याचा हक्क कसा उरतो? यासाठी देशाचे सरकारने कायदा करून याला बंदी घातली पाहिजे आणि आपल्या कागदपत्रांतूनही कोणा व्यक्तीच्या नावामागे या पदव्यांचा उल्लेख करता कामा नये. उदाहरणार्थ, भारतीय पार्लमेंटचे सभापती सरदार हुकूमसिंग यांचा उल्लेख श्री. हुकूमसिंग अगर मि. हुकूमसिंग असा झाला पाहिजे. या बाबतीत इंग्लंडचे संकेत मोठे अनुकरणीय वाटतात. नुकतेच लॉर्ड होम हे **पंतप्रधान** झाले. पण तेथे पंतप्रधान लॉर्ड असता कामा नये असा संकेत असल्यामुळे त्यांना लॉर्ड या पदवीचा त्याग करून श्री. किंवा मि. होम व्हावे


लागले आणि यासाठीच स्वतःला राजा, सरकार, देशमुख, इनामदार, देशपांडे, पाटील, कुलकर्णी इत्यादी पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांची आडनावे लावणे, म्हणवून घेणे आणि लोकांनी म्हणणे हा सामाजिक गुन्हा ठरविला पाहिजे व या गुन्ह्याबद्दल जरूर ती शिक्षा कायद्याने झाली पाहिजे. **माणसाचे सर्वस्व गेले तरी चालेल पण त्याचा स्वाभिमान** जाता उपयोगी नाही. समाजवाद, समता ही नुसती शब्दांनी उच्चारून कशी येणार ! एकाने दुसऱ्याला सरकार म्हणायचे याचा अर्थच हा की, सरकार हा प्राणी कोणीतरी मोठा मनुष्य–महापुरुष व मी एक क्षुद्र जीव ! मग कशी समता येणार ! येत नाही. खेड्यात तर हे गावठी सरकार, पाटील, कुलकर्णी या नावांतील गुर्मी आणखी कित्येक वर्षे तशीच रहाणार ! पाटलाच्या कुत्र्याला कोणी हाड म्हणता उपयोगी नाही. मग पाटलाच्या पोराला कोण काय म्हणेल ? तसे काही झाले तर त्या म्हणणाराचे जीवित आणि वित्त धोक्यात आलेच म्हणून समजा. यामुळे कित्येक नागरिकांना आपले गाव व घर-जमिनी मातीमोलाने विकून जावे लागले आहे. यासाठी या कायद्याची व त्याच्या सक्त अंमलबजावणीची फार मोठी गरज आहे.

## सरकारी नोकरशाही

गावच्या स्वास्थ्याबाबत गाव-कामगारांबरोबरच त्यांचे वरिष्ठ म्हणजे मुलकी आणि फौजदारी खात्याचे संबंध वसुली आणि शांतता व सुव्यवस्था या दृष्टीने येऊ लागला. अर्थात् या नोकरशाहीकडून जनतेच्या सुखसोयीकडे विशेष लक्ष पुरविण्याचे बाजूला राहून जनतेवर सत्ता गाजविणेच चालू राहिले. म्हणून सरकारने जनतेच्या सुखसोयीसाठी एक निराळे खाते काढून त्या खात्याला ‘ विकासखाते ’ असे नाव दिले व या विकासखात्याच्या मार्फत योजना राबवू लागले.

## विकासखाते

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर योजनाबद्ध रीतीने देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी पंचवार्षिक योजना आखली गेली व त्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मुख्यतः विकासखाते काम करू लागले. याप्रमाणे दोन पंचवार्षिक योजना राबविल्यानंतर अनुभव असा आला की, सरकारकडून योजना आली आहे. त्यांनीच ती पुरी करावी किंबहुना सरकारचे ते कर्तव्य आहे, असे मानून जनतेने बऱ्याच मोठ्या प्रमाणात बघ्यांची भूमिका घेतली. याचा परिणाम साहजिकच असा झाला की, विकासखात्यामार्फत होणाऱ्या सुधारणांमध्ये कामाचा जेवढा उठाव व्हावयास पाहिजे. तेवढा झाला नाही. म्हणून


जिल्हा परिषद
स्थायी समिति
सहकार समिति
कृषि समिति
अर्थ समिति
शिक्षण समिति
बांधकाम समिति
आरोग्य समिति
पंचायत समिति
ग्राम पंचायत
ग्रामीण जनता

सत्तेचे हे केंद्र राज्यात न राहता जिल्ह्याच्या ठिकाणी आणावे म्हणून पंचायत राज्याचा कायदा झाला.

## पंचायत राज्य

गावांना म्हणजेच ग्रामपंचायतींना व तालुका पंचायतींना अधिकार देण्यापूर्वी या सत्तेतला मोठा हिस्सा जिल्ह्याला देऊन जिल्हा परिषदेच्या रूपाने एक नवीन शासन, नवीन शक्ती जिल्ह्यामध्ये उभी केली. हे महाराष्ट्र पंचायत राज्याचे वैशिष्ट्य आहे. यामुळे प्रत्येक जिल्ह्याला जवळजवळ दोन ते अडीच कोटी रुपयांचा व्यवहार करण्याची सत्ता मिळाली. प्रत्येक जिल्ह्यात हे सत्तेचे केंद्रच निर्माण झाले. त्यातून या सत्तेचे पाणी खाली तालुका पंचायतींना व तेथून खाली ग्रामपंचायतींना पोहोचविले जात आहे. पंचायत राज्याच्या निवडणुकाही लोकातून प्रत्यक्ष निवडणूक पद्धतीने घेतल्या जात असून लोक-नियुक्तांचे तेथे फार मोठे मताधिक्य ठेवले आहे. या पद्धतीमुळे लोकांच्या मतांनी निवडून आलेला मनुष्य मन मानेल तसा वागण्यापूर्वी दहा वेळा विचार करून योग्य प्रकारे वागू शकतो.



ग्रामपंचायत बैठक

आपल्या पंचायत राज्यात दुसरी विशेष गोष्ट म्हणजे परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, चेअरमन तसेच तालुका-पंचायतीचे सभापती व उपसभापती या लोकांना आपला पूर्ण वेळ देऊन काम करावे लागत असल्यामुळे त्यांना पगार

देण्याची व्यवस्था केली आहे. काही लोकांना हा मोह आहे असे वाटते. पण तसे नसून ही जोखीम आहे. मी पगार घेतो तर मला हे काम केलेच पाहिजे व ते जबाबदारीने केले पाहिजे, याची जाणीव काम करणारास असणे जरूर आहे.

## पाटील

पंचायत राज्याच्या व्यवस्थेत गावच्या वसुलाचा बराच मोठा भाग पंचायतींना द्यावयाचा असल्यामुळे कुलकर्ण्यांऐवजी आलेल्या तलाठ्यास ग्राम-सेवक बनवून पंचायतीच्या ताब्यात दिले गेले. अर्थात् महसूल गोळा करणारा मुलकी पाटील गेला. गावच्या सर्वांगीण विकासाच्या जबाबदारीचे काम सरपंच पाहू लागला. पोलीस पाटील अजून आहे. तोही हळूहळू जाईल. गेला पाहिजे आणि तेथे जबाबदार पोलीस अधिकारी व त्याच्या मदतीला होमगार्ड संघटना आणि न्याय-पंचायत आली पाहिजे; म्हणजे ते एक जनतेच्या मानेवरील जोखड कमी होईल.

● ● ●

# ३. मोठेपणाची कल्पना

आपल्या देशातील समाजात मोठेपणाच्या कल्पना जुन्या रूढीवर आणि समजुतीवर आधारलेल्या आहेत. सरंजामशाही राजवटीत अधिकार म्हणजेच सत्ता व संपत्ती ज्याच्या हाती तोच मोठा ही कल्पना रूढ झाली. अजूनही तीच स्थिती आहे आणि थोड्याफार अर्थाने ती खरीही आहे. महात्मा गांधींसारखा अपवाद. त्यांच्याकडे कोठलीही सत्ता नव्हती व संपत्तीचा तर पत्ताच नव्हता. नंगा फकीर पण त्यांच्या पायावर सत्ताधीश आणि नवकोट नारायण लोळण घेत होते. पण सामान्यतः याच्या उलट प्रकार आहे. सत्ताधीश आणि संपत्तिधारक यांच्याच पायावर सर्वसाधारण समाजाला लोळण घ्यावी लागते. ही परिस्थिती बदलून समता-समाजवाद आपल्याला आणायचा आहे. ते आपले ध्येय आहे. आपले लोकशाही सरकार लोकशाही समाजवाद आणू इच्छित आहे. त्या दृष्टीने कायदेकानू करण्याचे चालू आहे. पण सध्याच्या गतीने आणि कायद्याच्या अम्मल-बजावणीतील शिथिलतेने कधी काळी समाजवाद या देशात येईल यावर सर्व-साधारण समाजाचा विश्वास बसत नाही; आणि म्हणून बहुजन व बहुसंख्य समाज नाराज आहे. त्याला खऱ्या अर्थाने समाजवाद येईल असे वाटत नाही. यामुळे उदासीनता वाढली आहे. पण असे उदासीन राहून चालणार नाही.

आपला देश खेड्यांचा आहे. शेकडा ७० टक्के लोक खेड्यात राहातात. ती खेडी सुधारली पाहिजेत. तेथे खऱ्या अर्थाने समता आली पाहिजे आणि ती केव्हा येईल तर लोकांच्या कल्पना आमूलाग्र बदलतील तेव्हाच.

## श्रमप्रतिष्ठा

श्रमाला प्रतिष्ठा आली पाहिजे. श्रम न करणाराची प्रतिष्ठा गेली पाहिजे. ती केव्हा जाईल ? तर श्रम न करता जीवन जगणे कोणालाही शक्य नसले पाहिजे. याचाच अर्थ संपत्तीची विभागणी किंवा मर्यादेपेक्षा अधिक संपत्ती व्यक्तीच्या मालकीची न राहता ती देशाच्या मालकीची झाली पाहिजे. खेड्यात-सुद्धा कोणते घर मोठे ? तर ज्या घरातील बायका घरात बसून राहतात. ज्यांच्या घरी भांडी घासणे, धुणी धुणे, दळणकांडण करणे इत्यादी कामे मोलकरणींकडून करून घेतली जातात. शेतावर तर जात नाहीतच, पण गोषा पाळतात; ते घर मोठे. या पद्धतीमुळे संपत्तीची वाढ होत नाही. जमिनीचे उत्पन्न वाढत नाही.



विकास-कार्याकरिता बैठक

आवक घटली, जावक वाढली. याचा परिणाम असा झाला की, अशी घरे म्हणजे समाज सर्व दृष्टींनी खाली खाली चालला आहे. दारिद्र्य आले म्हणजे माणसाची नीतिमत्ताही बिघडते. " बुभुक्षितः किम् न करोति पापम्. " नैतिक पातळी

घसरली म्हणजे त्याचा शेवटी अधःपात-सर्वनाश ठरलेला असतो. अशा तऱ्हेची बरीच प्रतिष्ठित मानून घेणारी घराणी खेड्यात आहेत. त्यांनी आपली चाल बदलली पाहिजे. सुख-संपदा, आरोग्य, नीती इत्यादींचे रक्षण करण्यासाठी आपले हातपाय हालविले पाहिजेत. काम करण्यात कमीपणा मानता उपयोगी नाही. नव्हे! काम केलेच पाहिजे. स्वतःसाठी केले पाहिजे. देशाच्या भल्यासाठी केले पाहिजे. यासाठी आपल्या खेड्यातील विकासकार्यास वाहून घेणाऱ्या सेवकांनी त्यांचे मतपरिवर्तन केले पाहिजे. अशी कुटुंबे स्वतः-साठी जरी काही करू लागली तरी त्यांचा स्वाभिमान राहील. देशावर त्यांचा जो बोजा पडतो तो कमी होईल. अर्थात् घरगुती व छोट्या उद्योगधंद्यांची यासाठी फार मोठी जरूरी आहे. प्रत्येक खेडेगावात तशी सोय झाली पाहिजे.



श्रमदान

हीच गोष्ट सार्वजनिक कामांचीही आहे. आमच्या सांगली जिल्ह्यात श्रमदानाने रस्ते, शाळा-इमारती, पिण्याच्या पाण्याच्या विहिरी, विमानतळ इत्यादि कामे झाली आहेत. ही कशी झाली? श्रम करण्यात प्रतिष्ठा आहे. ही शिकवण या जिल्ह्यातील पुढारी, कार्यकर्ते, अधिकारी यांनी मानली म्हणूनच! एकदा असे झाले. एका खेडेगावी महारवाड्यात श्रमदाम करण्याचे काम दे. भ. पूज्य स्वामी रामानन्द भारती यांच्या नेतृत्वाखाली चालू होते. स्वतः स्वामीजी

हे म्हातारे गृहस्थही घाम फुटेपर्यंत कुदळीने उकरीत होते. सर्व गाव, अधिकारी तेथे आले, पण गावातील एक सावकार आले नाहीत. त्यांनी पगार देऊन गडी पाठविला. या गोष्टीची सर्वांनाच चीड आली. महाराज म्हणाले, 'हा प्रतिष्ठित मेला म्हणजे याला माती द्यायला गावातील कोणीही जाऊ नये. फार तर पगारी गडी पाठवावे.' सारांश, अशा लोकांनी स्वेच्छेनेच आपल्या प्रतिष्ठितपणाच्या कल्पना बदलल्या पाहिजेत. याची आजच्या घडीला जरूरी आहे.

## घराण्याची प्रतिष्ठा

मी असुक असुक घराण्यातला, माझे वडील असे असे होते, त्यांचा मुलगा नातू, पणतू म्हणून मी मोठा. माझे घराणे मोठे. माझ्याच घराण्यातील किंवा



वैर

भावकीतील माणसे मोठी. तीच ग्रामपंचायतीत आली पाहिजेत व या गावातील सत्ता त्यांच्याच हातात असली पाहिजे—या भावनेने जे लोक ग्रामपंचायतीत येतात, त्यांची दृष्टी गावाच्या सेवेकडे असत नाही. सत्तासंपादनाकडे असते. अर्थात्

अशा भावनेने हाती घेतलेली सत्ता ही सेवा कशी घडू देणार! हे लोक सत्तेवर आल्यावरोबर सत्तेचा दुरुपयोग करावयास लागतात. निवडणुकीच्या वेळी 'तू का मी? तुला मते का?' यामुळे एकमेकांबद्दल गैरसमज, अपप्रचार आणि शेवटी कटुता व त्यातूनपु ढे वैर. यामुळे अपयशवाला तर नाराज होतोच, पण तो सततच चांगल्या कामातदेखील विरोध करीत राहतो. यामुळे यश मिळवणारासही प्रगती करता येत नाही. यासाठी खेड्यात राहणारी आपण सर्व माणसे या खेड्याचे मालक आहोत. बरे व वाईट या दोन्हींची जबाबदारी सर्वांवर आहे. सर्वांना सारखाच अधिकार आहे. येथे कोणी हलका नाही व कोणी भारीही नाही. अशी सर्वांची भावना असणे जरूर आहे. गावात जे निरनिराळे समाज राहतात, त्या सर्व समाजांतून चांगली नीतिमान आणि भली माणसे असतील त्यातून ग्रामपंचायत निवडली पाहिजे. अशा कार्यकर्त्या माणसांनी एकत्र बसून विचार करून गावच्या सुधारणेचा कार्यक्रम आखून तो पार पाडला पाहिजे. तसे होत नाही. म्हणून कोणतीही सुधारणा चांगले मूळ धरू शकत नाही. सरपंचाची जागा ही मानाची जागा नसून सेवेची संधी आहे. तेथे लायक असलेला—मग तो कोणत्याही जातीजमातीचा असो, तो–निवडला गेला पाहिजे. पण तसे न होता घराण्याच्या भलत्या प्रतिष्ठेच्या अभिमानाने एकादा अनीतिमान गावगुंड कित्येक वेळा निवडला जातो व मग सर्वत्र खेळखंडोबा–घोटाळे होऊन जातात.




## गावची अब्रू

एखाद्या व्यक्तीच्या चांगुलपणाला त्याच्या अयोग्य वागणुकीने जसा तडा जातो, त्याची किंमत शून्य होते, तसेच गावाचेही आहे. म. गांधींच्या कल्पने-

प्रमाणे प्रत्येक खेडे हे स्वयंपूर्ण आणि आदर्श कुटुंब बनले पाहिजे, तरच खेडयाचा उद्धार होईल. तेथे रामराज्य निर्माण होईल. या दृष्टीने एक कुटुंब म्हटल्यावर त्याला मी माझे म्हणतो व त्याची काळजी घेतो, तसेच दुसऱ्याचेही समजले पाहिजे. मग माझे घर तसेच दुसऱ्याचे, माझा मुलगा तसाच दुसऱ्याचा, माझी आई-बहीण तशीच दुसऱ्याची, माझे शेत तसेच दुसऱ्याचे, असे मानले पाहिजे. माझ्या घरावर कोणी दगड मारला तर मला आवडणार नाही. माझ्या मुलाला कोणी बोलले अगर तडाखा दिला तर मला बरे वाटणार नाही. राग येतो. मग मी दुसऱ्याचा मुलाला बोललो किंवा मारले तर त्याला नाही का राग येणार ? माझ्या बहिणीकडे एखाद्याने वाईट भावनेने पाहिले तर मला चीड येते. मग मी दुसऱ्याच्या स्त्रीकडे वाईट भावनेने पाहिले तर त्याला नाही का चीड येणार ? माझ्या शेतात दुसऱ्याचे जनावर शिरले व चरले तर मी रागाने खवळतो. मग माझी जनावरे दुसऱ्याच्या शेतात शिरली तर त्याला नाही का राग येणार ? या दृष्टीने विचार करून प्रत्येक माणसाने वागले पाहिजे. पण तसे पुष्कळांचे हातून होत नाही आणि यासारख्याच कारणांनी खेडयात कायमचे पिढ्यान् पिढ्या वैर चालू आहे. ही परिस्थिती नव्या पंचायत राज्यात बदलली पाहिजे. सध्याच्या समाजवादी समाजरचनेचे ध्येय गाठू इच्छिणाऱ्या पंचायत राज्यात वरीलप्रमाणेच विचार करणारा विचारवंत नवसमाज निर्माण झाला पाहिजे. न्यायाची बाजू घेऊन अन्यायाविरुद्ध उठण्याची तयारी झाली पाहिजे. गावात राहणाऱ्या सर्व नागरिकांची अशी तयारी असली पाहिजे. त्यासाठी मोठेपणाचे व पदाधिकारीपद स्वीकारणाऱ्या माणसाने अशी प्रतिज्ञा केली पाहिजे व ती अमलात आणली पाहिजे की, " अन्याय करणारा कोणीही आप्त अगर मित्र असला तर त्याला योग्य शासनापुढे खेचण्याची व जास्तीत जास्त कडक शिक्षा भोगायला लावण्याची माझी जबाबदारी आहे व मी ती पार पाडीन. " अशा रीतीने पंचायतीत आलेला प्रत्येक सभासद वागण्यास तयार होईल तर खेडयात हरघडी गरिबावर जे अन्याय होतात, ते बंद होतील व गावाला इष्ट वळण लागेल. उभ्या पिकात गुंडांची जनावरे चरणे बंद होईल. पिकांची जबरी चोरी थांबेल. गरिबांच्या बायाबापडयाकडेदेखील वाईट नजरेने पाहण्याची कोणाही गुंडाची छाती होणार नाही आणि गावाची अब्रू जाणार नाही. गावाचा लौकिक वाढेल, शांतता नांदेल, वाया जाणारी बुद्धी कामाला लागली तर तिचा उपयोग गावाच्या उद्धारासाठी होईल व तो तसा झाला पाहिजे.

• • •

# ४. ग्रामसुधारणा

पहिल्या विभागात खेड्यातील जुन्या व बुरसटलेल्या कल्पना बदलून गावातील समाज चांगल्या मार्गावर कसा येईल हे पाहिले. तसा तो आला म्हणजे सुख-सोयींचे मार्ग शोधणे व त्याप्रमाणे प्रगती घडवून आणणे सोयीचे होते.

## शिक्षण

शिक्षणाने मनुष्याचा माणूस होतो. यासाठी त्याच्यावर योग्य संस्कार होणे जरूर आहे. म्हणून शिक्षण ही माणसाची पहिली गरज आहे. आपल्या गावात एकही व्यक्ती अशिक्षित रहाणार नाही असे प्रयत्न होणे अत्यंत जरूर आहे. निदान सर्व माणसे साक्षर तरी केली पाहिजेत. त्यांना लिहिता–वाचता यावे, यासाठी ग्रामशिक्षण योजना चालू आहे आणि सबंध खेडे साक्षर झाले




साक्षरता प्रौढवर्ग

म्हणजे त्या गावचा ग्रामगौरव समारंभ करावयाचा व लोकांना उत्तेजन द्यायचे. असे समारंभ गावोगाव होत असताना हल्ली दिसतात. पण प्रत्यक्षतः किती यश आले आहे ? मोठाच प्रश्न आहे. काही थोडे होत आहे. जे होत आहे, त्यापेक्षा फसवणूक अधिक मोठया प्रमाणावर चालू आहे. ती थांबवून होईल तितके साक्षरतेचे काम करून ती साक्षरता टिकवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नुसता ग्रामगौरव समारंभ करून मोकळे झाले, की ' गंगेत घोडे न्हाले ' असे सध्या होत आहे. दोन वर्षांपूर्वी ग्रामगौरव झालेल्या गावात जाऊन पाहिले तर फार थोडी साक्षरता शिल्लक असलेली दिसेल. तसे होऊ नये, यासाठी वाचनाची सोय करून ती साक्षरता टिकवण्याचे विविध प्रयत्न केले पाहिजेत. बरेचसे लोक निरक्षर असले तरी ते संपूर्ण अडाणी नाहीत. त्यांना नागरिकत्वाचे व इतर अवश्य ते शिक्षण दिले तरी भागेल. लोकशाहीतील आपले हक्क व जबाबदाऱ्या ते उचलतील आणि त्याच शिक्षणाची खरी खरी गरज आहे आणि त्यासाठी समाजशिक्षणाची प्रशिक्षण केंद्रे चालविली पाहिजेत.

प्राथमिक शिक्षण हा सर्व प्रकारच्या शिक्षणाचा पाया आहे. कोणतीही इमारत उभारताना तिचा पाया भक्कम करण्याचा प्रयत्न केला जातो. पाया भक्कम असेल तर इमारत सुरक्षित रहाते आणि दीर्घकाळ टिकते. त्याचप्रमाणे शिक्षणाचे आहे. प्राथमिक शिक्षण हे बालवयात दिले जाते. ते वय संस्कारक्षम असते. या वयात जे संस्कार बालमनावर केले जातात ते दीर्घकाल टिकतात. मनुष्याचा खरा माणूस प्राथमिक शिक्षणकालातच तयार होतो. प्राथमिक शिक्षण काळातील संस्कार हे कायम स्वरूपाचे व दीर्घकाळ परिणाम करणारे असतात. म्हणून प्राथमिक शिक्षणाची योग्य काळजी घेतली पाहिजे.

अशी काळजी सध्याच्या पंचायत राज्यात घेतली जाते का ? या प्रश्नाचे उत्तर काही अस्तिपक्षी येणार नाही. सध्या काम चालले आहे ते पाहिले तर हे शिक्षण देणारा शिक्षक, मुलाचा पालक आणि पंचायत समिती हा शासक, या तिघांच्याकडे तरी प्रामुख्याने नजर फेकली पाहिजे.

## शिक्षक

आजचा प्राथमिक शिक्षक कोणत्या अवस्थेत आहे ? मुख्यतः त्याच्यात शैक्षणिक पातळी किंवा ध्येयवाद फार थोडा म्हणजे अगदीच थोडया लोकात. नाहीतर बाकीचे सर्व आर्थिक परिस्थितीने गांजलेले. मुळातच शैक्षणिक पात्रता कमी असलेले, थोडक्यात अर्थदरिद्री आणि कर्मदरिद्री. अर्थात् त्यामुळे प्रतिष्ठा घालवून बसलेले. यामुळे यांच्या हातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत

अशी अपेक्षा करणे म्हणजे मृगजळाने तहान भागविण्यापैकीच होय. त्यांच्या चेहऱ्यावर उदासीनता, पोशाख गबाळा, नियमितपणा वेताचा, वाणीत सत्य, करारीपण इत्यादींचा अभाव. मग त्यांच्याकडून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार कसे होणार! शिक्षकांमध्ये लोकशाहीत आणखी एक प्रकार आहे. तो पुढारी शिक्षकांचा. ते वरिष्ठावर **इंप्रेशन** मारून व त्यांच्या सान्निध्यात राहून पुढारी-पणच करीत हिंडतात. यामुळे त्यांचा उपयोग शिकवण्याच्या कामी फारच थोडा होत असतो. हे कोणा ना कोणा लोकप्रतिनिधींचे हस्तक असतात. नात्या-गोत्याचे असतात. ही मंडळी "आम्ही हवे तसे वागणार। आमचे कोण काय करणार?" या वृत्तीने वागत असतात. वरिष्ठ अधिकारी अशा प्रकारच्या शिक्षकाच्या सहसा वाटेला जात नाहीत. नव्हे यांना पाहून ते संक्रांतीच्या चालीने म्हणजे त्यांच्या उलट दिशेला तोंड करून चालतात. हे सर्व वजा जाता शेकडा सुमारे २०/२५ टक्के जे उरतात ते बिचारे ध्येयवादाने व कर्तव्यबुद्धीने राबतात आणि ते ज्या विद्यार्थ्यांच्या वाटयाला येतात त्यांच्यावरच थोडेफार संस्कार होतात.

## पालक

शाळेत मुलाचे नाव घातले, की संपले आपले कर्तव्य असे मानणाऱ्या पालकांची संख्या पंचायत राज्यातील पालकांमध्ये फार मोठी आहे. यातील काही पालक वर्षभर आपल्या मुलाची प्रगती किती आहे याकडे ढुंकूनही पहात नाहीत. मुलगा वर्षअखेर नापास झाला म्हणजे शिक्षकाला भेटणार! कोणी वर घाला म्हणून गळ घालणार. कोणी दम देणार, कोणी शिक्षकाची मुलादेखत बदनामी करणार! प्रसंगी शिक्षकाला शिव्या देणार व त्याच्या अंगावर हात टाकण्याचीही तयारी करणार!

## शासक

पंचायत राज्यात तपासणी-अधिकारी बी. डी. ओ. च्या हुकमतीखाली, बदल्या जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रशासकाच्या हाती, हुकमावर सही एज्यु. ऑफिसरची. तालुकापंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीचे सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष आणि या सर्व समित्यांचे सभासद मंडळी यांनी बदल्यात हस्तक्षेप करायचा. यामुळे चांगले काम करणारे कित्येक शिक्षक शिक्षेदाखल बदलले जातात आणि वाईट काम असणारे म्हणण्यापेक्षा पुढाऱ्यांच्या तैनातीत असलेले सर्व सुखसोयींनी युक्त अशा कटावर बसणार!

नेमणुका निवडणूक-समिती करणार. सारांश काय? नेमणूक एकाकडून, बदली दुसऱ्याकडून, तपासणी तिसऱ्याकडून, हस्तक्षेप चवथ्याकडून आणि प्रत्यक्ष देखरेख सरपंचाची. त्रयस्थळी ही म्हण पंचायत राज्यात मागे पडून पंचमस्थळी झाली आहे. सारांश, पंचायत राज्यात शिक्षणाची पंचाईत झाली आहे.

## उपाय

शिक्षण ही राष्ट्राच्या उभारणीतील महत्त्वाची बाब आहे. लोकशाही यशस्वी व्हावयाची असेल तर लोक चांगले पाहिजेत. शिक्षणाने ते सुशिक्षित, सुसंस्कृत व प्रामाणिक आणि जबाबदार नागरिक झाले पाहिजेत. ज्या देशात अशा नागरिकांचा भरणा अधिक तोच देश भरभराटीस येतो व तेथील लोकशाही यशस्वी होते.

( १ ) यासाठी देशातील तज्ज्ञांकडून सर्व देशासाठी एक अभ्यासक्रम ठरवून प्रत्येक प्रांताला तो त्या त्या भाषेत पुरवावा.

( २ ) प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया समजून ते सरकारने आपल्या ताब्यात घ्यावे. पंचायत राज्याकडे ठेवायचेच असेल तर पॉलिसी आखण्यापलीकडे व देखरेखीपलीकडे सभासदाकडे काही अधिकार असू नयेत.

( ३ ) प्राथमिक शिक्षण देणाऱ्यांची एकच विशिष्ट लायकी ठरवावी व ती असणारास शिक्षक नेमावे. त्यात जात-पात, धर्म-वर्ग काही असू नये.

( ४ ) इयत्ता ४ अखेरचे सर्व प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे. त्या मुलांचे अन्न, पाणी, रहाणे, जेवणे, कपडे, पुस्तके सर्व सरकारने पुरवावे.

( ५ ) शिक्षण-कर म्हणून खास कर बसवावा.

( ६ ) प्राथमिक शिक्षक हा स्वयंपूर्ण असण्यासाठी त्याला भरपूर वेतन द्यावे, की त्या वेतनामुळे तो सन्माननीय नागरिक म्हणून जीवन जगू शकेल.

( ७ ) आजच्या प्राथमिक शिक्षकाबाबत ॲड्मिनिस्ट्रेशन कडक करून त्यांच्या सर्व्हिसेसची गरज ठरवावी.

( ८ ) लाचलुचपत, वशिलेबाजी, अप्रामाणिकपणा, अनैतिकता इत्यादी बाबतीत शासनाने कठोर व्हावे.

( ९ ) पंचायत राज्यातील घटकांनी शिक्षणखात्याच्या ॲड्मिनिस्ट्रेशनमध्ये ढवळाढवळ करू नये. निदान शिक्षकांच्या बदल्याबाबत तरी अधिकाऱ्यावर सोपवून द्यावे.

दुय्यम शिक्षण इयत्ता ५ पासून पुढे चालू व्हावे. सरकारने देशासाठी एक अभ्यासक्रम ठरवून तो पुरवावा आणि हे शिक्षण खाजगी शिक्षणसंस्थांकडे सोपवावे. त्यासाठी त्यांना विशिष्ट प्रमाणात पण भरपूर अनुदान द्यावे. ही अनुदानाची रक्कम जिल्हा परिषदेच्या मार्फत मिळावी; पण परिषद एज्यु० ऑफिसरच्या शिफारशीप्रमाणे ती दिली जावी.

खाजगी शिक्षणसंस्था या काही ध्येयवादाने चालविल्या जातात. शिक्षण-संस्था सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक उत्थापनाची केंद्रे असावीत आणि राष्ट्राला पोषक असे शिक्षण तेथे दिले जाऊन, राष्ट्र-उभारणीला उपयुक्त असे आदर्श नागरिक तेथे तयार व्हावेत. शिक्षणक्षेत्राला स्वास्थ्य लाभू दिले तरच हे होऊ शकेल. त्यासाठी हे शिक्षण शिक्षणसंस्थांच्या अखत्यारीत पूर्णपणे असण्याची गरज आहे.


• • •

## ५. आरोग्य

आरोग्य हा माणसाच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. चांगले आरोग्य सर्वांनाच हवे असते. प्रकृती निकोप हवी असेल तर शुद्ध हवा, पाणी व सकस अन्न यांचा पुरवठा प्रत्येक व्यक्तीला झाला पाहिजे. त्याचबरोबर व्यक्तीनेही नियमितपणाच्या काही चांगल्या सवयी लावून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उदाहरणार्थ, नियमित व्यायाम, झोप, शरीराची, कपडयाची आणि घराची स्वच्छता इत्यादि. यात जरूर ती दक्षता प्रत्येक व्यक्तीने घेतली पाहिजे.

खेडयात निसर्गतः हवा चांगली असते. अलीकडे काही गावांत पिण्याच्या पाण्याचीही सोय झाली आहे. परंतु अजून बरीच खेडी अशी आहेत की, तेथे पिण्याच्या पाण्याची चांगली सोय नाही. विशेषतः मागासलेल्या अस्पृश्य मानलेल्या जमातींची सोय अजून पुष्कळ खेडयात झाली नाही. परंपरागत रूढीमुळे हा समाज अजून गावच्या सार्वजनिक पाणीपुरवठयाच्या विहिरीवर पाणी भरू शकत नाही. त्यांच्यासाठी स्वतंत्र अशी चांगलीशी सोय नाही. पाण्याच्या बाबतीत त्यांचे अजून मोठया प्रमाणावर हाल चालू आहेत. त्यांची सोय करण्याचे काम प्रथम हाती घेतले पाहिजे. ग्रामपंचायतीचे ते प्रथम कर्तव्य होईल. त्यानंतर कपडे धुण्यासाठी व जनावरांना पाणी पाजण्यासाठी प्रत्येक खेडयात एक तरी मोठा तलाव असला पाहिजे. मग त्या गावचा पाण्याचा प्रश्न

सुटला असे म्हणता येईल. जी गावे नदीच्या पाण्याचा उपयोग करतात, अशा गावात नदीला जाणारा एक तरी घाट बांधला पाहिजे, म्हणजे त्यांची बरीच चांगली सोय होईल.




पाण्याची सोय

सकस अन्नपुरवठ्याचा प्रश्न हा ज्याच्या त्याच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून रहाणारा आहे. तथापि ज्यांना नियमित उत्पन्नाचा काही आधार नाही, अशा लोकांसाठी गावात छोटे-छोटे उद्योगधंदे उपलब्ध करून दिले पाहिजेत. गावात बाराही महिने काम मिळेल अशी सोय केली पाहिजे. त्यांना नियमितपणाने पैसे देऊन चांगले धान्य मिळेल अशी सोय गावात सहकारी स्टोअर्सद्वारे करून ठेवली पाहिजे. किमान आपल्या गावात कोणी बेकार राहू नये व कोणालाही उपास काढायची पाळी येऊ नये अशी दक्षता पंचायतीने घेतली पाहिजे.

हवा, पाणी, अन्न यांची योग्य काळजी घेतल्यानंतर आरोग्यविषयक चांगल्या सवयी लावून घेतल्या पाहिजेत. अजून अशी खेडी आपल्या राज्यात आहेत की, तेथे सकाळच्या विधीसाठी पाणी वापरले जात नाही. मातीने अगर दगडाने घसारा करतात. ही अवस्था निघून गेली पाहिजे. नंतर दात घासणे, शौचकूपांचा वापर करणे याही सवयी पाहिजेत. बहुतेक खेड्यांत पायखाने नाहीतच; पण जेथे वर्षानुवर्षे म्युनिसिपालिटीज आहेत, नगरपालिकेचा सुवर्णहीरक नव्हे अमृतोत्सव साजरे झाले तरी तेथे पुरेसे संडास नाहीत आणि लोक रस्त्यावर शौचास बसतात. मग खेड्याबद्दल बोलायलाच नको. तेथे संडासांचा पत्ताच नाही. अलीकडे काही खेड्यांत थोडे थोडे बांधले आहेत. पण त्यांचा वापर फारच

थोडे लोक करतात. त्या संडासांच्या आसपास बाहेरच आपला विधी उरकून मोकळे होतात. यासाठी जिल्हा परिषदेने तालुका पातळीवर आणि तालुक्याने गावपातळीवर चढाओढी ठेवून जे गाव जास्तीत जास्त पायखाने बांधील आणि त्यांचा योग्य वापर करील त्याला बक्षीस मिळेल. तसेच ज्या तालुक्यातील जास्तीत जास्त गावे संडास बांधतील व योग्य प्रकारे वापरतील त्यांना बक्षीस, असे काही ठेवले पाहिजे.

रस्ते आणि गटारे, गावातील मुख्य मुख्य रस्ते तरी तावडतोब योग्य भर घालून तयार केले पाहिजेत व त्यांच्या कडेची गटारे बांधून काढून घरातील सांडपाणी गटारात व गटारातील पाणी गावाबाहेर घालविण्याची व्यवस्था केली पाहिजे; अगर शोष-खड्डे काढून त्यांत सांडपाणी सोडले पाहिजे, म्हणजे डासांचा उपद्रव होणार नाही.




दवाखाना

औषधपाण्याची सोय पाच ते दहा हजार वस्तीच्या ग्रूपमध्ये एक दवाखाना आणि बाळंतपणाची सोय व त्या ठिकाणी क्वालिफाईड डॉक्टर आणि

नर्स व त्यांना जरूर ती औषधे आणि साधने, इमारती इ० पुरवठा केला पाहिजे. मोठ्या ग्रामपंचायतींनी आपल्या गावात ही सोय अवश्य केली पाहिजे व त्याचा फायदा शेजारच्या लहान गावांनाही मिळाला पाहिजे. कुटुंब-नियोजनाची ऑपरेशन करण्याचीही सोय तेथे असली पाहिजे, म्हणजे लोकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकेल.

बाग—प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या हद्दीत एक छोटीशी बाग आणि त्या बागेस लहान मुलांना खेळण्यासाठी साधने–झोपाळे, घसरगुंडी, सीसॉ इत्यादि सोय आणि सार्वजनिक रेडिओ इत्यादि करण्याचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे व तेथे स्त्रिया आणि मुले यांनी जाऊन त्या साधनांचा उपयोग करावा अशी सवय लावली पाहिजे. ग्रामपंचायतीने अशा तऱ्हेने आपले उद्दिष्ट ठरवून ते अमलात आणण्याचा प्रयत्न केला तर अशक्य असे काही नाही. तालुका पंचायतीने व जिल्हा परिषदांनी त्यास उत्तेजन द्यावे.

खताचे खड्डे गावाबाहेर असणे ही आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. त्यामुळे खतही चांगले मिळते व गावचे आरोग्य राखण्यासही मदत होते. यासाठी ही गोष्ट अवश्य केली पाहिजे.

• • •

## ६. बांधकाम

प्रत्येक खेडेगाव योग्य रस्त्याने मोठ्या शहराशी जोडणे अत्यंत जरूर आहे. त्यासाठी गाव आणि मुख्य रस्ता (रोड) यांना जोडणारा अप्रोच रोड तयार झाला पाहिजे आणि असा तयार करणे ही गोष्ट ग्रामपंचायतीला शक्य नाही. कारण अशा रस्त्याला खूप खर्च येतो. अर्थात् आपली नित्याची कामे करून या रस्त्यावरील खर्चाचा ताण ग्रामपंचायत सहन करू शकणार नाही. त्यासाठी तालुका पंचायत समिती व जिल्हा परिषद यांची मदत अवश्य आहे. तशी मदत घेऊन दळणवळणाचीही सोय झाली तर प्रवास करणे सुखाचे होईलच ! त्याचबरोबर शेतकऱ्यांनी खेड्यात तयार केलेल्या मालाला शहरातील पेठेत पोहोचविणे सुलभ होईल आणि त्यामुळे शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळून त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल.

**श्रमदान**--रस्ते तयार करण्याचे कामी गावकऱ्यांकडून श्रमदान होणे जरूर आहे. हे श्रमदान सर्व गावकरी एकजुटीने व आत्मीयतेने करतील तर पुष्कळसे काम होऊ शकेल. अर्थात् त्यासाठी योग्य वातावरण गावात तयार केले पाहिजे आणि हेच ग्रामपंचायतीचे महत्त्वाचे कार्य आहे. पंचायतीचे सरपंच, पंच व गावातील इतर प्रतिष्ठित माणसे पुढाकार घेऊन प्रथम खोरे-कुदळ घेऊन कामास लागले तर मग गावातील तरुण मंडळी, विद्यार्थीवर्ग वगैरे हौसेने श्रमदानात भाग घेतात व पुष्कळसे काम होते. त्या कामाचे मोल पैशाने करता येणार नाही. अशा तऱ्हेने श्रमदान केलेल्या रस्त्यासंबंधी म्हणा अगर इतर कामासंबंधी म्हणा, सर्व ग्रामस्थांना एक प्रकारची आपुलकी वाटते आणि त्यामुळेच फार फायदा होतो. सर्वांची अन्तःकरणे त्या कामाकडे लागतात.

विकास कामामध्ये काही दिवसांपूर्वी ग्रामस्थांच्या वाटणीचा शेअर श्रमदानाने भरून काढल्यामुळे सरकारी मदतीवरच पुष्कळ कामे वेळेवर आणि चांगली झाली. कॉंट्रॅक्टरचा शेअर त्या कामावरच खर्च पडल्यामुळे योग्य मटे-रियल वापरून सरकारी नमुन्यापेक्षा कितीतरी चांगल्या इमारती, रस्ते इत्यादी कामे झाली आहेत. आमच्या सांगली जिल्ह्याने अशा प्रकारे श्रमदान करून पुष्कळच काम केले आहे. विशेषतः पूज्य स्वामी रामानन्द भारती जिल्हा विकास मंडळाचे उपाध्यक्ष असतांना या कामास फार मोठी चालना मिळाली.

पंचायतीच्या क्षेत्रात कमीत कमी शाळागृह, विकासमंदिर, हायस्कूलची इमारत, सोसायटीचे ऑफीस, वाचनालय, तालीम, गोडाउन, दवाखाना, बाळंत-पणाचे हॉस्पिटल, बालशिक्षण केंद्र इतक्या इमारती; पिण्याच्या पाण्यासाठी बंदिस्त विहिरी; संडास; गावातील रस्ते; गटारे इतके तरी इमारतीचे बांधकाम करून घेणे जरूरीचे आहे.

यानंतर म्हणजे गावासाठी एखादी मोठी धरण-योजना अगर पाझर-तलाव ही कामे ग्रामपंचायतीने ठरावरूपाने मागणी करून जिल्हा परिषदेमार्फत सरकारकडे पाठविली पाहिजेत व चिकाटीने पाठपुरावा करून योजना पदरात पाडून घेतली पाहिजे. अशा तऱ्हेची मोठी कामे सरकारकडून घेताना गावात एक प्रकारची एकजूट असावी लागते. अशा कामासाठी सरकारी तज्ज्ञ जी जागा पसंत करतील ती बिनबोभाट दिली पाहिजे. पुष्कळ वेळा खेड्यात अशा बाबतीत एकमत कधीही होत नाही. अधिकाऱ्यांना पसंत नसलेली व कमी फायद्याची योजना सुचविली जाते आणि कारण काय असते तर आपली जमीन, त्या धरणाखाली बुडून जाऊ नये व आपले नुकसान होऊ नये. ही संकुचित भावना जाऊन गावाचे हित होते, त्यात आपले थोडेसे अहित झाले तरी चालेल,

अशा तऱ्हेचा विशाल दृष्टिकोन निर्माण झाला पाहिजे आणि हेच गावातील जाणत्या मंडळींचे व कारभारी मंडळीचे काम आहे.

शक्य तर गावातील लहानसान कामाचे कॉन्ट्रॅक्ट्स ग्रामपंचायतीने घेऊन आपल्यामार्फत ग्रामस्थांच्या मदतीने ती कामे पुरी करून घेतली पाहिजेत, तरच अधिक आणि चांगले काम होते.

● ● ●

# ७. शेती

आपला देश शेतीप्रधान आहे. भारतातील शेकडा ७० टक्के लोक शेती व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करतात आणि देशाच्या एकंदर उत्पन्नापैकी ५० टक्के उत्पन्न शेतीमधून मिळते. या गोष्टी लक्षात घेतल्या तर शेती उत्पादन वाढीवर लक्ष देण्याची किती मोठी जरूरी आहे हे लक्षात येईल. आपले सरकार आणि नेते यांच्या ही गोष्ट लक्षात आलेली आहे आणि म्हणूनच त्यांनी शेती विकासाच्या कामावर भर दिला आहे. देशातील पिकाला योग्य अशी इंच इंच जमीन पिकाखाली आली पाहिजे. पडीक जमीन कोठेही राहता उपयोगी नाही, यासाठी सरकार आपल्या मालकीच्या जमिनी ज्यांना जमिनी नाहीत अशा शेतकऱ्यांना देत आहे.

## उत्पादन कसे वाढेल ?

शेती उत्पादन कसे वाढेल याचा तर सरकारला ध्यासच लागला आहे. पण ही गोष्ट एकट्या सरकारला ध्यास लागून होणारी नाही. प्रत्यक्ष राबणारा, उत्पन्न काढणारा जो शेतकरी आहे, तो सरकारी प्रयत्नाला साथ देणारा, जागृत व कष्टकरी असला पाहिजे. सुदैवाने तशी जागृती शेतकरी वर्गात होत आहे, ही गोष्ट पूर्वीचा म्हणजे स्वातंत्र्य पूर्वकाळातील शेतकरी आणि स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी जे पहात आहेत, त्यांच्या ध्यानात आलेली आहे. शेतकरी आपल्या देशात जास्तीत जास्त पीक कसे काढता येईल, यासाठी धडपडत आहे. विचार करीत आहे, चर्चा करीत आहे, उपाय शोधीत आहे.

## उत्पादनवाढीवर उपाय

( १ ) जमिनीची धूप थांबविण्यासाठी व ओलावा राखण्यासाठी ताली घालणे जरूर आहे. तो कार्यक्रम सरकारने हाती घेतला आहे.

( २ ) पाणीपुरवठा करून जास्तीत जास्त जमीन पाण्याखाली आली पाहिजे. त्यासाठी विहिरी खोदणे आणि शक्य तेथे नद्यांना धरणे बांधून शेतीला पाणी-पुरवठा करणे अगर उपलब्ध पाण्यासाठी लिफ्ट इरिगेशन करणे.

( ३ ) उत्तम मशागत करण्यासाठी सुधारलेली अवजारे वापरणे. अर्थात त्यांचा शेतकऱ्यांना पुरवठा करणे.

( ४ ) शास्त्रीय पद्धतीने शेती करण्याचे ज्ञान शेतकऱ्याला दिले पाहिजे. त्या दृष्टीने त्यांच्या शेतावर तज्ज्ञाकडून प्रयोग करून त्यांचे प्रात्यक्षिक दिले पाहिजे.

( ५ ) सेंद्रिय रासायनिक मिश्र खताचा पुरवठा शेतकऱ्याला करणे अत्यंत जरूर आहे.

( ६ ) पिकावर पडणाऱ्या रोगांवर कीडनाशक औषधे वापरण्याचे ज्ञान देऊन योग्य वेळी जरूर त्या साधनांचा व औषधांचा पुरवठा केला पाहिजे.

( ७ ) पीक रक्षणाची खेड्यापाड्यातून फार जरूरी आहे. त्यासाठी पीक संरक्षक सोसायट्या काढून त्यांच्यामार्फत पिकांची राखण केली पाहिजे.

( ८ ) शेतीसाठी जरूर तितक्या भांडवलाचा पुरवठा केला पाहिजे.

( ९ ) शेतीच्या शास्त्रीय ज्ञानाची माहिती ठिकठिकाणी शिबिरे भरवून शेतकऱ्याला दिली पाहिजे.

## उपायांची अंमलबजावणी

सरकारने वरील सर्व उपाय अमलात आणावे म्हणून पुष्कळ प्रयत्न केले आहेत व चालूही आहेत. मात्र त्याचा फायदा जितका शेतकऱ्याच्या पदरात पडावा तितका पडत नाही. याला माझ्या मते मुख्यतः दोन कारणे आहेत. एक शेतकरी अज्ञानी आहे आणि दुसरे ज्या एजन्सीमार्फत सरकार उपाययोजना करीत आहे, त्या एजन्सीज कार्यक्षम नाहीत. विशेषतः खते, बी-बियाणे इत्यादि बाबतींत भांडवल-पुरवठा होतो. त्या भांडवलाचा सदुपयोग सर्व शेतकऱ्यांकडून होत नाही. बैल आणि शेती अवजारे खरेदी यासाठी घेतलेली तगाई मुलामुलींच्या लग्नात खर्च होते आणि शेताची मशागत चांगली होत नाही. पैशाच्या अभावी कसले तरी बीबियाणे वापरले जाते. खताशिवाय जे नशिबाने येईल ते येईल अशी अवस्था होते. दुसरी गोष्ट म्हणजे पुरवठा करणाऱ्या सोसायटीसारख्या एजन्सीज यांच्याकडून खताच्या बाबतीत तर फारच दुरुपयोग होतो. वेळेवर म्हणजे हंगामात खते सोसायटीत नसतात. येतात त्या वेळी पैसा शेतकऱ्यांच्या

हातांत नसतो. मग व्यापारी पद्धतीने ती खते भांडवलवाल्याकडे निघून जातात. सोसायट्यांतूनही काळाबाजार होतो आणि ते म्हणणे मात्र पाप ठरते. खेड्यातील मध्यवर्ती मोठ्या गावातील एखाद्या सोसायटीस ही एजन्सी मिळाली असल्यामुळे इतर गावांतील शेतकरी जागृत होऊन ती खते पदरात पाडून घेऊ शकत नाही. ते त्याला महागही पडते. ग्रामसेवकाचे लिहून आणा. शेतकी मदतनिसाचा अभिप्राय आणा. त्यांची भेट होणे, त्यांनी लिहून देणें, मग खताचे एक पोते घेणे, ते गाडीने आपल्या गावी वाहून नेणे यांत जाणारा वेळ आणि पैसा विचारात घेतला तर महाग पडते हे ध्यानी येईल. लेखकाने याचा अनुभव घेतला आहे. म्हणून पंचायत राज्यात शेतीसाठी लागणारी अवजारे, यंत्रे, बी-बियाणे, खते इत्यादी योग्य हंगामात शेतकऱ्याला घेऊनच दिली पाहिजेत, म्हणजे पैशाचा दुरुपयोग होण्याची भीती नाही. खते वगैरेंचा पिकांना फायदा मिळेल. अर्थात् यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने कारभार-यंत्रणा उभारली पाहिजे. पंचायत सभासदांनी सेवाभावाने आपापल्या वॉर्डातील शेतकऱ्यांसाठीं काही श्रम केले पाहिजेत. पिकांच्या क्षेत्राचे मानाने त्याचे वाटप झाले पाहिजे. यासाठी गावची सोसायटी देखील पंचायतीच्या देखरेखीखाली असली पाहिजे. असे झाले तर अन्यायाला वाव रहाणार नाही व पंचायत राज्याचा पाया भक्कम होत जाईल.

महाराष्ट्र राज्य बरेच आघाडीवर आहे. ताली घालणे, विहिरी खोदून पाणीपुरवठा करणे, सुधारलेली अवजारे पुरविणे, प्रयोग करणे, प्रात्यक्षिके करणे, खते व बी-बियाणे पुरविणे इ० सर्व चालू आहे. खताच्या बाबतीत तर सन १९६३।६४ सालात राज्य सरकारने दोन कोटी रुपये सबसिडी द्यायची ठरविले आहे. शेतकऱ्यांविषयी असलेल्या तळमळीतून सर्व कार्यक्रमावर जोर दिला आहे. पण त्याचा फायदा प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत ज्या प्रमाणात पोचायला पाहिजे तेवढा पोचत नाही; आणि तो पोचविणे हे पंचायतीचे मुख्य ध्येय असले पाहिजे, तरच पंचायत राज्य यशोमंदिराकडे वाटचाल करीत आहे, असे म्हणता येईल.

● ● ●

# ८. सहकार

सध्याची जगाची परिस्थिती पाहिली तर परस्पर सहकारावाचून जगाचे व्यवहार चालणे अशक्य आहे असे दिसते. या दृष्टीने विचार करू लागल्यास भारतासारख्या नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशाला तर आपली प्रगती साधण्यासाठी सहकार्याशिवाय दुसरा मार्गच नाही, तरणोपाय नाही; आणि हे लक्षात घेऊन आपल्या देशाच्या धुरंधर नेत्यांनी सहकाराचीच कास धरली आहे, असे कोणासही कबूल करणे भाग पडेल. आपल्या स्वाभिमानाला आणि स्वातंत्र्याला धक्का न लागता, जगातील सर्व विचारांच्या आणि आचारांच्या ज्या ज्या लोकांचे ( देशांचे ) सहकार्य मिळेल त्यांचे सहकार्य घेऊन आपल्या भारताचे नेते गेली ५धरा वर्षे वाटचाल करीत आहेत.

निरनिराळ्या देशांकडून सहकार्य मिळाले, मदत मिळाली, म्हणूनच भाक्रा-नानगल, कोयना यांसारख्या मोठ्या धरण व विद्युत् योजना; भिलाई, रुरकेला, दुर्गापूरसारखे मोठमोठे लोखंडी सामानाचे कारखाने; सिंद्रीसारखे खतकारखाने, तसेच विमाने, मोटारी इ० कारखाने या देशात उभे राहिले; व उत्पादन वाढवून देशाच्या प्रगतीत भर घालीत आहेत. आपली सर्व प्रांतिक सरकारे व देशाचे मध्यवर्ती सरकारही शेतीसुधारणा, साखरकारखाने, उद्योगधंद्यांची वाढ इत्यादि अनेकविध मार्गांनी सहकार्याने देशाचे पाऊल पुढे कसे पडेल हे पहात आहेत. इतकेच नव्हे, तर चीनसारख्या विश्वासघातकी शत्रूपासून बचाव करण्याच्या दृष्टीने देखील जगातील बहुसंख्य राष्ट्रांचे सहकार्य आणि सहानुभूती आपल्या राज्यकर्त्यांनी मिळविली आहे. यामुळे सहकार्य हा आमच्या जीवनाचा आधार झाला आहे. त्याच्याशिवाय भारतासारख्या देशाला उद्धाराचा दुसरा मार्ग नाही. म्हणून या मार्गानेच देशाने वाटचाल केली पाहिजे.

पूर्वीच्या आपल्या समाजरचनेतही सहकार्याचा भाग फार मोठा असे. साधी आपली खेडी घेतली तर तेथे सुतार, लोहार, चांभार, न्हावी, परीट इत्यादी विविध धंदे करणारे समाज असत. ते शेतकऱ्यांना सहकार्य देत. शेतकरीही त्यांना धान्य अगर आपल्या शेतात जे पिकेल ते थोडे देत असत व त्या सर्वांचेच जीवन सुखावह होत असे. अजूनही थोड्याफार प्रमाणात खेड्यात हे चालू आहे. शेतकरी इरजिक किंवा पैरा करतात. हे देखील सहकार्य आहे. आज आमच्या शेताची नांगरट, उद्या तुमच्या शेताची, तसेच पेरणीचेही करतात. मुलामुलींच्या लग्न-

कार्यातही सर्वत्र सहकार्य चालू असते. तेथे कोठल्याही प्रकारचा स्वार्थ किंवा स्वहित तेवढेच नसे. म्हणूनच साधुसंतांनी म्हटले आहे—

" एकमेका सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ॥ "

केवढा उदात्त विचार या सहकार्याच्या भूमिकेमागे आहे. बरोबर याच विचारसरणीने चालले तर आपल्या समाजाचे व देशाचे भले होण्यास मुळीच वेळ लागणार नाही.

सहकार्याचा हेतू, आपली मूळ समाजरचना, सरकारचे प्रयत्न हे सर्व चांगले आहेत. सरकारने आणखी एक पाऊल पुढे टाकून सहकारी खातेच पंचायत राज्याकडे देऊन टाकले आहे. हेतू स्तुत्य ! पण आज चाललेले सहकार्याचे प्रयोग पाहिले, तर सहकारी वृत्ती अंगी मुरलेल्या माणसाला हे सहकार्य पहाण्यापेक्षा आपले डोळे लौकर मिटतील तर बरे असे वाटते. असे का वाटावे ? सरकारने सहकारी कायदा पास करून कारखाने, धंदे, शेती इ० कामांसाठी भांडवल पुरविण्याच्या दृष्टीने सहकारी बँका, तगाई, भू-विकास बँका इ० काढून व्यवस्था केली. तगाईतून दिली जाणारी अवजारे व शेतकऱ्यांचा माल विकण्यासाठी व लागणारा माल विकत घेण्यासाठी खरेदीविक्री संघ काढले. सोसायट्या स्थापन केल्या. पण या सर्व सहकारी संस्थांतून चालू असलेले सहकार्य पाहून " अलीबाबा आणि चाळीस चोर " या गोष्टीची आठवण होते. त्या अलीबाबाचे व चाळीस चोरांचेही सहकार्यच होते. तसल्या सहकार्याची आज आपल्या देशाला गरज आहे काय ? आपल्या काखेतलेच सभासद करून घ्यायचे. त्यांच्या जोरावर बहुमत बनवायचे आणि पंचकमिटी म्हणा, नाहीतर डायरेक्टर बोर्ड म्हणा, होयबांचे निवडून आणायचे आणि वाटून वाटून पाळीपाळीने संपवायचे. असे करणारे अलीबाबा सहकारी क्षेत्रात फार मोठ्या संख्येने वावरत आहेत.

या लोकांचाही पुन्हा एक सहकारी गट तयार होतो. तो गट जिल्ह्याची, तालुक्याची व तालुक्यातील काही संस्थांची वाटणी करून त्या त्या संस्थारूपी कुरणात सहकार्याच्या नावाखाली खुशाल चरत असतात. मलिदा सर्व या बाबांच्या खिशांत भत्त्याच्या, कमिशनच्या, ऑनरेरियमच्या आणि काळ्या बाजाराच्या रूपाने पडत असतो. अर्थात् काही ठिकाणी हे सहकारी अलीबाबा मोठ्या धूर्तपणाने व्यवहार करतात. भत्ता, ऑनरेरियम, वेळ व खर्च म्हणून राजरोस घेतात आणि कमिशन कोणातरी आप्तांच्या नावे एजन्स्या घेऊन मिळवितात. तसेच काळाबाजार नोकराला पाठीशी घालून परभारे चालू ठेवतात व सहकारी कार्य-

कर्ते म्हणून हे महाभाग समाजात मोठ्या प्रतिष्ठेने वावरत असतात. अशाने सहकार्य व सहकारी संस्था वाढतील काय ? सरकार कमिशन एजन्सीज व्यक्ती व्यापाऱ्यांना देण्याऐवजी संस्था म्हणून सहकारी संस्थांना देतात. त्याचा फायदा प्रत्यक्ष गिऱ्हाइकाला फारसा न मिळता या अलीबाबांच्या खिशात पडतो. जीवनोपयोगी साखरेसारख्या वस्तू व लोखंड, सीमेंट, पत्रा, खते इ० नित्योपयोगी वस्तूंचा काळाबाजार करून वाडे–बंगले उठवणारे व मोटारी उडवणारे सहकारी अलीबाबा संख्येने दिवसेंदिवस वाढत आहेत. यांच्याही इस्टेटीची तपासणी सरकारने केली पाहिजे.

पंचायत राज्य म्हणजे परमेश्वराचे राज्य–"**पाचामुखी परमेश्वर**". सत्ता केंद्रित असली म्हणजे अयोग्य गोष्टींना वाव फार असतो. म्हणून विकेंद्रीकरण केले. या विकेंद्रीकरणाच्या राज्यात तरी वरील प्रकार बंद पडले पाहिजेत. तो नफा आणि ते कमिशन प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या, गिऱ्हाइकाच्या खिशात पडले पाहिजे. उदा० २५०० रुपयांची इलेक्ट्रिक मोटार असेल व ती शेकडा १० टक्के कमिशनने विकली जात असेल तर कमिशन वजा जातां २२५० रु. स ती शेतकऱ्याला मिळाली पाहिजे. यासाठी खालीलप्रमाणे जरूर ती उपाययोजना झाली पाहिजे—

( १ ) वस्तूसाठी दिली जाणारी तगाई रोखीने न देता ती वस्तूंच्या रूपाने दिली गेली पाहिजे.

( २ ) अलीबाबागिरी किंवा दादागिरी करणाऱ्यासाठी कायद्यात अशी तरतूद केली पाहिजे की, यांना कोठल्यातरी एका सहकारी संस्थेत पदाधिकारी रहाता यावे.

( ३ ) पंचायत राज्य आले आहे. ते यशस्वी केले पाहिजे म्हणून या धंदेवाल्या सहकारी कार्यकर्त्यांनी प्रथम आत्मशुद्धी करावी. एका संस्थेत पदाधिकारी राहून बाकीच्या सर्व संस्थांतील अधिकाराच्या जागांचे राजिनामे द्यावेत.

( ४ ) जे लोक निवडणुकीच्या झंझाटात पडत नाहीत, पण सच्चे सहकारी कार्यकर्ते आहेत, अशांना निरनिराळ्या एकेका ठिकाणी निवडून आणून त्यांच्या स्वाधीन ती संस्था करावी.

( ५ ) आपणहून आपल्या नातेवाइकांच्या अगर संबंधितांच्या नावच्या एजन्स्या सोडाव्या. फार तर आपल्या सहकारी संस्थेच्या नावाने करून द्याव्यात म्हणजे सहकारी संस्थेला कमिशन मिळून तिची आर्थिक परिस्थिती सुधारेल.

( ६ ) जेथे फुलटाईम वर्कर्सची गरज आहे तेथे सरळ योग्य त्या प्रमाणात कामाच्या मानाने व संस्थेच्या आर्थिक परिस्थितीच्या मानाने जरूर तेवढा आणि भरपूर पगार द्यावा.

( ७ ) कामराज योजनेप्रमाणे फक्त मंत्र्यांनाच आपल्या इस्टेटीची माहिती देण्याची आज्ञा झाल्याचे ऐकतो. नुसते मंत्र्यांवर न भागवता सरकारने आपले वरिष्ठ अधिकारी ( सेकंडक्लासपासून वरचे ), तसेच सहकारी क्षेत्रातील हे अली-बाबा, इन्कम् टॅक्स भरणारे व्यापारी इ० सर्वांनाच हिशेब मागितले पाहिजेत. स्वराज्य मिळाल्यानंतर केवळ १५ वर्षांत सहकारी क्षेत्रातून सेवा करतो म्हणविणारांच्या घरावर कौले नव्हती तेथे माडया, वाडे, बंगले उठले आणि स्वतःच्या मोटारीतून फिरू लागले. त्यांच्या जमिनीं, बँकातील शिलका यांची मोजदाद झाली तर किती तरी सहकारी कार्यकर्ते यात सापडतील.

( ८ ) सहकारी क्षेत्रात राहून ज्यांनी अफरातफरी केल्या त्यांच्या नुसत्या चौकशा कित्येक वर्षे करीत न बसता तावडतोब खटले भरले पाहिजेत. हे सरकारने जरूर केले पाहिजे.

( ९ ) सहकारी खात्यात कायदा मोडला तरी गुन्हा नाही व पाळला तरी गुन्हा नाही, असे चालते. सहकार्य बिघडू नये म्हणून शक्य तो मेळ घालण्याचा प्रयत्न केला जातो, ते बंद व्हावे आणि गुन्हे नोंदले जावेत व गुन्हेगारांना योग्य ते शासन व्हावे. पोटनियमांचे उल्लंघन करणारास पदाधिकारी रहाता येऊ नये. काही वर्षे निवडणुकीला उभे रहाता येऊ नये. इतके तरी कडक शासन झाले पाहिजे म्हणजे काही सुधारणा होतील. सहकारी तत्त्व चांगले आहे. आम्ही सहकारी चांगले नाही आहोत. ते व्हावे म्हणजे पंचायत राज्यात सहकार्याचा फायदा सर्वांना मिळेल.

● ● ●

# ९. उद्योगधंदे

आपल्या देशात बारमाही पाऊस नसल्यामुळे व पिकांना पाणी देण्याची असावी तितकी सोय नसल्यामुळे, अर्धाअधिक खेडूत शेतकरी व शेतमजूर रोजगाराविना बेकार राहिलेला आहे. अशा लोकांना घरगुती छोटे छोटे उद्योगधंदे मिळाले तर त्यांच्या उत्पन्नात भर पडेल आणि कोणालाही अर्धपोटी रहाण्याची पाळी येणार नाही. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या गावापुरती एकेक योजना आखली पाहिजे. प्रत्येक खेडेगावात किमान दोन तरी धंदे करता येण्यासारखे आहेत. ते म्हणजे कोंबड्या पाळणे आणि म्हशी पाळून दूधदुभत्याचा धंदा करणे. या दृष्टीने विचार करू.

## कोंबड्या पाळणे

हल्ली सुद्धा बऱ्याच शेतकरी कुटुंबातून कोंबड्या पाळतात, पण त्या जातिवंत नसतात. १५ दिवस अंडी देतात. महिनाभर खुडुक बसतात. संरक्षण नसते. मांजरे मारून टाकतात. औषधयोजना नसते. रोगाने मरतात आणि त्यापासून योग्य फायदा होत नाही. यासाठी सरकारी योजनेचा फायदा घेऊन आपल्या खेड्यात याचाच विचार करणारी सहकारी मंडळी स्थापन केली पाहिजे. तिच्यामार्फत जातिवंत कोंबड्या पुरविल्या पाहिजेत. जातिवंत कोंबडी वर्षातील ३४७ दिवस अंडी घालते. आपण ३०० धरू. आजच्या बाजारभावाने हिशेब केला तर ५० रु. होतात. अशा १० कोंबड्या पाळल्या व त्यांची योग्य काळजी घेतली तर दरसाल ५०० रुपयांचे उत्पन्न प्रत्येक कुटुंबाला मिळू शकेल. अर्थात् यासाठी थोडेसे भांडवल शेतकरी कुटुंबाला पुरविले पाहिजे. जातिवंत कोंबड्या पुरविल्या पाहिजेत. त्यासाठी आसऱ्याची सोय केली पाहिजे. त्यांना चारापाणी देण्याचे योग्य शिक्षण दिले पाहिजे. वर्षातून त्यांच्यावर रोगप्रतिबंधक उपाययोजना केली पाहिजे. या सर्व गोष्टींसाठीच स्वतंत्र सहकारी सोसायटी स्थापन करून योग्य ती सरकारी मदत घेऊन काम केले पाहिजे. सरकारने कोंबड्यांचे विमे उतरण्याची देखील सोय केली असल्यामुळे, कोंबडी मेली तर नुकसानीची भीती नाही. तसेच अंडी घेऊन जाण्याची सोय केली असल्यामुळे घरबसल्या पैसा हाती येण्याची सोय झालेली आहे.

## म्हशी पाळणे

म्हशी पाळण्यासाठीही सरकारकडून तगाईरूपाने भांडवल पुरविले जाते. त्याचा उपयोग करून प्रत्येक शेतकरी कुटुंबाने फेरासाठी म्हणून दोन म्हशी पाळल्या व त्यांचे दूध सरकारी योजनेला पुरविले तर फार मोठी मदत स्वतः शेतकऱ्याच्या कुटुंबाला होणार आहे. अर्थात् धंदा म्हणून ही गोष्ट केली पाहिजे. जनावरांचीही योग्य आहार देऊन निगा राखली पाहिजे. भारी दूध देणाऱ्या म्हशीच पाळल्या पाहिजेत. खेडेगावात वळूची अडचण भासते. हल्ली पुष्कळ ठिकाणी कृत्रिम गर्भधारणा केंद्रे निघाली आहेत. तेथे नेऊन म्हशी गाब घालवून आणता येतात.

ग्रामपंचायतीच्या काही सभासदांनी विधायक काम म्हणून कोंबड्या पाळण्याचे काम, काही सभासदांनी म्हशी पाळण्याचे व दूधदुभते पुरविण्याचे काम, काहींनी शेतीसाठी जरूर ते साहित्य व खते पुरविण्याचे काम अशी विविध कामे वाटून घेऊन आपल्या गावाची सेवा करण्याचे धोरण अंगिकारण्याची जरूर आहे. परंतु असे काही न करता 'तू मोठा का मी मोठा ! तूच सरपंच का ? मी का नाही ?' यातच भांडणे करून काहीही विधायक काम न करणे व पंच म्हणून केव्हातरी पंचायतीच्या सभेला हजर राहणे–ते सुद्धा नियमित नाहीच— अशांनी ग्रामपंचायतीत येऊ नये. लोकांनी त्यांना निवडूनही देऊ नये. परंतु निवडणूक हा एक निराळा मामला आहे. खेडेगावात त्या वेळी जातीचा, गल्लीचा भलताच अभिमान निर्माण करून केवळ मोठेपणासाठी पंचायतीत येण्याचा प्रयत्न होतो. पंच होणे, सरपंच होणे हा मानाचा भाग नसून सेवेची ती जागा आहे असे समजून गावासाठी विविध योजना जे पंच-सरपंच राबवतील तेच गाव सुधारेल. त्यासाठीच पंचायत राज्य करून सरकारने सत्तेचे विकेंद्रीकरण केले आहे. आमच्या खेड्यांतील ग्रामपंचायती मुख्य हेतू लक्षात घेऊन आपापल्या खेडेगावचा उद्धार करतील अशी आशा करू या.

## औद्योगिक सहकारी संस्था

सध्या खेड्यात देखील बेकारी वाढत आहे. रोजगार मिळण्याची खात्री नाही. अशा वेळी त्या त्या खेड्यात अगर आसपासच्या भागात जो कच्चा माल उपलब्ध असेल, त्या मालाचे पक्क्या मालात रूपान्तर करणाऱ्या सहकारी संस्था काढून त्यांमार्फत भांडवलाचा पुरवठा करून उद्योगधंद्यांना उत्तेजन दिले पाहिजे.

मजूर सोसायट्यांना हत्यारांचा पुरवठा व गोडाऊन बांधण्यासाठी कर्ज-पुरवठा करून सोय करता येईल. जेथे घायपाताचे उत्पन्न असेल तेथे वाख तयार

करणे व त्यापासून दोरखंडे तयार करण्यास उत्तेजन देता येईल. कौले व विटा तयार करण्यासाठी कर्जपुरवठा करून माल तयार करता येईल. विणकरांना एकत्र आणून त्यांना भांडवल पुरवून विणकराचे काम करण्यास उत्तेजन देता येईल. याखेरीज वैयक्तिक कारागीर आणि कलाकारांनाही जिल्हा परिषदेकडून आर्थिक साहाय्य देता येते. या गोष्टीचा फायदा आपापल्या विभागातील खेड्यांना कसा देता येईल याचा प्रयत्न जिल्हा परिषद, तालुका पंचायत समिती व ग्रामपंचायत समितीच्या सभासदांनी करून उद्योगधंद्यांची वाढ करावी म्हणजे बेकारी नष्ट करण्यात यश मिळवता येईल.

● ● ●

## १०. समाजकल्याण

आपल्या देशामध्ये हिंदूंत ज्या निरनिराळ्या जाती-जमाती आहेत, त्यांत महार, मांग, चांभार, ढोर इत्यादी मानीव अस्पृश्य जमाती आहेत. अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील मोठा कलंक आहे, तो पुसून टाकला पाहिजे, म्हणून आजवर अनेक मान्यवर नेत्यांनी प्रयत्न केले. महात्मा ज्योतीराव फुले त्यांचे अनुयायी म्हणून कोल्हापूरचे छत्रपती शाहूमहाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे तसेच महात्मा गांधी आणि त्यांचे अनुयायी यांनी अस्पृश्यता घालविण्याचे आटोकाट प्रयत्न केले.

देश स्वतंत्र झाल्यावर तर आपल्या सरकारने असे ठरवून टाकले की, आपल्या देशात अस्पृश्यतेला थारा द्यायचा नाही. त्यासाठी कायदा केला. सर्व सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता मानणे हा गुन्हा ठरविला. त्यामुळे बराचसा परिणाम झाला आहे. पण परंपराप्रिय रूढीमुळे अजून अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन झाले नाही. केवळ अस्पृश्यता नाहीशी होऊनही तो समाज स्पृश्य समाजाच्या बरोबरीला येणार नाही. त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे, त्यांचे दारिद्र्य दूर झाले पाहिजे. भक्कम आर्थिक पायावर तो समाज उभा राहिला पाहिजे. म्हणून सरकारने त्यांच्यासाठी 'समाज-कल्याण' नावाचे खाते सुरू करून त्या खात्यामार्फत अस्पृश्योद्धाराचे कार्य सुरू केले आहे.

पंचायत राज्यात आता हे खाते जिल्हा परिषदेकडे दिले आहे. त्याच्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला एक समाजकल्याण अधिकारी असतो व त्याला असिस्टंट म्हणून इन्स्पेक्टर व ऑफिस दिले आहे. या खात्याने अस्पृश्य व मागासलेल्या

जातींसाठी सरकारने केलेल्या कायद्याप्रमाण सर्व सोयी-सवलती त्यांच्या झोपडी-पर्यंत पोचविण्याच्या आहेत. अस्पृश्य विद्यार्थ्यांची शालेय फी तर पहिल्यापासून सरकार भरतेच. पण खेड्यांत शिक्षणाची सोय नसल्यामुळे जे विद्यार्थी व विद्यार्थिनी आपले गाव सोडून मध्यवर्ती ठिकाणी अगर शहरात येऊन वसतिगृहात राहून आपला अभ्यासक्रम पुरा करतील, त्यांना प्रत्येक मुलामागे दरमहा २० रुपये व मुलीमागे २५ रु. जेवणखाणे इत्यादींसाठी सरकार खर्च करते. यामुळे या समाजातील मुलामुलींना शिक्षण घेणे सोईचे झाले आहे. पंचायत राज्यात या सोयी-सवलतींचा फायदा खेड्यापाड्यातील प्रत्येक पालकाला सांगून, त्यांची मुले-मुली मध्यवर्ती ठिकाणी वसतिगृहात राहून शिक्षण घेतील असे काम झाले पाहिजे. अगर नियमाप्रमाणे शक्य त्या ठिकाणी अशी वसतिगृहे काढून त्या मुलामुलींना शिक्षणाचा फायदा दिला पाहिजे. हल्ली बऱ्याच मोठ्या प्रमाणावर हे काम सुरू आहे. पण या स्कीमचा गैरफायदा घेणारे काही महाभाग त्या समाजतही निर्माण होत आहेत ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. त्यांनी आपल्या समाजाला वर काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सरकारने या समाजाच्या मुलां-बरोबरच स्पृश्य समाजातील काही मुलांना यांच्या वसतिगृहात सवलत दिली पाहिजे. हल्ली २० टक्के मिळते. पण भाषा, संस्कृती, सवयी सर्वच जर बदलणे जरूर आहे, तर या हरिजन मुलांच्या वसतिगृहात ५० टक्के तरी पुढारलेल्या समजल्या जाणाऱ्या पण आर्थिक दृष्टीने गरीब असलेल्या अशा मुलांना संधी दिली पाहिजे. शिक्षणात संस्कृती बदलली तर लौकरात लौकर अस्पृश्यता-निवारण होण्यास मदत होईल.

याखेरीज दुसरा आणि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या समाजाची आर्थिक परिस्थिती चांगली सुधारली पाहिजे. ती सुधारण्यासाठी छोटे छोटे उद्योगधंदे त्यांना उपलब्ध करून दिले पाहिजेत. अर्थात् त्यासाठी भांडवलाची जरूरी आहे. या समाजासाठी सरकारी नियमाप्रमाणे भांडवल देताना जे तारण लागते, ते तारण देण्यासारखे यांच्याजवळ खास असे काही असत नाही, व यामुळे यांना कर्ज मिळू शकत नाही. यासाठी सरकारने काही खास योजना आखली पाहिजे.

आर्थिक परिस्थितीवर या समाजाच्या मूलभूत गरजा—अन्न, वस्त्र, निवारा—अवलंबून आहेत. खेडेगावातून हरिजनांच्या जागेची फार मोठी अडचण आहे. लोकवस्ती वाढत आहे यामुळे गावठाणे वाढविणे जरूर आहे. ही गावठाणे वाढविताना दिल्या जाणाऱ्या प्लॉटमध्ये हरिजनांना वेगळे एका बाजूस प्लॉट न देता अधूनमधून दिले पाहिजेत. त्या सोसायटीत त्यांनाही सभासद करून घेऊन जे घर तयार होईल त्या घराच्या तारणावर कर्ज दिले पाहिजे व छोट्या छोट्या

हरिजनांनी परत घेतले पाहिजे. या दृष्टीने सरकारने काही प्रयत्न केले आहेत. आमच्या सांगली जिल्ह्यात तुंग आणि घोगांव येथे एक हजार रुपयांतून बेघर सोसायटी-मार्फत घर बांधून दिले आहे. ती सुद्धा १२–१२ च घरे बांधली आहेत. या वेगाने सबंध देशातील अस्पृश्यांच्या घरांचा प्रश्न केव्हा सुटणार? यासाठी गती वाढविली पाहिजे. ते होईपर्यंत या समाजानेही प्रयत्न करून हौसिंग सोसायट्या स्थापन करून घरांचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

अस्पृश्यता निवारण्याचा कायदा करून भागणार नाही. अस्पृश्यांची शिक्षण, रहाणी इ० सुधारून सांस्कृतिक बदल घडवून आणला पाहिजे. हे जितके खरे आहे, तितकीच स्पृश्य समाजाची या बाबतीची प्रतिक्रिया अजमावून त्यांचे मन वळविले पाहिजे. नाहीतर कायदा राहतो पुस्तकात आणि गावोगावी अस्पृश्य आणि स्पृश समाज यांच्यामध्ये कटकटी वाढून ते एकमेकांच्या जवळ येण्याऐवजी कायमचे दुरावत जातात. यासाठी समाज-कल्याण खात्यामार्फत, जिल्हा परिषद व तालुकापंचायत समित्यांनी कार्यक्रम आखून अंतःकरणे एकत्र आणून अस्पृश्यता नाहीशी केली पाहिजे. किमान सोयी म्हणजे रहायला घर, पिण्यासाठी पाणी, उपजीविकेचे साधन म्हणून धंदा, शिक्षण इत्यादी त्या समाजाला उपलब्ध झाल्या पाहिजेत. ग्रामपंचायतच आता गावच्या सुधारणेच्या बऱ्याच गोष्टी करणार असल्यामुळे काही काल गावचे सर्व बजेट जरी या समाजाचे उद्धारासाठी खर्च केले तरी चालेल असे त्यांनी ठरविले पाहिजे; आणि अगोदर या मंडळींची सोय लावून मग आपल्या इतर गोष्टी केल्या पाहिजेत, तरच सुधारणा झपाट्याने होतील.

• • •

विकासाच्या छायेतील

# सलगरे

★

## १. उघडचा माळावरील टुमदार गाव

मिरजहून पंढरपूरला जाताना मिरज-पंढरपूर रेल्वेच्या पूर्व बाजूस मिरजहून २१ मैलांवर सलगरे हा गाव दिसतो. गावापासून ३ फर्लांगांवर सलगरे स्टेशन आहे. दंडोबाच्या डोंगराची रांग जेथे संपते, तेथे जवळच स्टेशन आहे व त्याच्या-पूर्वेस हा गाव आहे. प्रदेश कमी पावसाचा असला तरी गावच्या पूर्व बाजूने वाहणाऱ्या ओढ्याकाठी असलेल्या झाडीमुळे वाळवंटातील ओयासीससारखा हा भाग दिसतो व त्यामुळेही माळरानातील रुक्ष प्रदेशातून प्रवास करणाऱ्या देवाच्या गाडीतील प्रवाशांच्या मनाला सलगरे गावाबाहेरील भव्य अशी मंगलोरी कौलांची प्राथमिक शाळा, ओढयाकाठची झाडे व पलीकडील बागायती पाहून काहीसे समाधान वाटते.

## २. नवजागृत जनता

गावचे पुढारी गावकामगार विठ्ठलराव पाटील ऊर्फ दाजी यांचा वाडा गावच्या मध्यभागी उंच ठिकाणी आहे. दरवाजापुढील पायऱ्या व तेथूनच थेट पूर्वेकडे जाणारा प्रशस्त रस्ता यांमुळे दाजींचा वाडा हे गावातील एक सौंदर्यस्थळ वाटते. वाडयात जाऊन दाजींना भेटताच प्रथम दाजींनी गृहस्थाश्रमाला अनुसरून

पाणी दिले व फार दिवसांनी वरं येणं केलं ? असा प्रश्न विचारला. त्यावर मी सांगितले, दाजी, अलीकडे तुमच्या गावाने विकास-कार्यात अवघ्या महाराष्ट्रात नाव मिळविल्याचे ऐकले, वाचले. तेव्हा प्रत्यक्षच पाहून यावे म्हणून आलो. दाजी म्हणाले, कसली प्रगती ! प्रतिकूल परिस्थितीत रहाणारी आम्ही माणसे. त्यात निसर्गाचा देखील आमच्यावर कोप. मेघराजा प्रसन्न झाला तर आनंद. दाजी पुढे सांगू लागले, " आमच्या वडिलांचा श्रीपती पाटलांचा खून झाला. खेड्यातील अज्ञान हेच त्याला कारण होते व त्या वेळपासून गावात कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नव्हता. मी दत्तक आलेला मला तरी कोण विचारणार ! पाहुणा माणूस. परगावचा मी. पण दत्तक झालो. अर्थात् हे घर-उत्पन्न-पाटीलकी माझी झाली. तसाच गावही माझा झाला. मी मनाशी ठरविले या गावाला बदलून टाकायचे. काही नवे मित्र जोडले. योग्य मार्गाने जायचे ठरविले. हळू हळू प्रगती करायची होती मला. त्यासाठी मी प्रथम माझ्या मित्रांचा, नंतर गावाचा विश्वास संपादन केला. स्वराज्य आलं. आमचे बॅ. जी. डी. पाटील १९५२ साली या भागातून प्रथम कायदेमंडळावर निवडून आले. पंचवार्षिक योजना सरकारने आखली, आणि विकासाकडे जनतेची पावले पडू लागली. मग आम्ही एकेक पाऊल उचलले. " मी विचारले, ' सुरवात कोठून केली ? ' दाजी म्हणाले, ' सांगतो. '

## ३. ग्रामपंचायतीची स्थापना

"पहिल्याने आम्ही १९५६ साली ग्रामपंचायतीची स्थापना केली. पहिली कमिटी बिनविरोध आली. पण गांवची आर्थिक बाजू अगदीच लंगडी. अनियामित पाऊस व जमीन माळरान यांमुळे उत्पन्न बेताचे. इतर उद्योगधंदेही काही नाहीत. यामुळे आमच्या गावचे पहिले सरपंच श्री. गंगाप्पा शिवलिंग जतकर, श्री. कृष्णा दादा जाधव, श्री. बाळासाहेब कुंडले वगैरे मंडळींनी असे ठरविले की, गावची सर्व कामे श्रमदानाने करून घ्यायची. " मी विचारले, " दाजी, तुम्ही त्यात असालच ? " दाजी म्हणाले, " मी सर्व मंडळींत सततच आहे. पण मी त्यांच्या कोणत्याही कमिटीचा पदाधिकारी नाही. आम्ही सर्वांनीच एकत्र बसून श्रमदानाने करावयाच्या कामाचा आराखडा तयार केला. " आम्ही असे बोलत आहोत, इतक्यात माजी सरपंच श्री. गंगाप्पा आण्णा, आजी सरपंच श्री. दत्तात्रय पाटील, श्री. जाधव वगैरे मंडळी दाजींच्या वाड्यात आली. नमस्कार वगैरे झाल्यावर दाजी म्हणाले, "गंगाप्पा आण्णा ! कोकाटे साहेब मुद्दाम आपले गाव पहायला आलेत. [ मी या भागाला १९५३ ते ५७ अखेर असि. डे. ए. इ. होतो ] तुम्ही त्यांना ओळखताच !" " वा ! नुसते ओळखत नाही. ५६–५७

विकासाच्या छायेतील

# सलगरे

★

## १. उघडया माळावरील टुमदार गाव

मिरजहून पंढरपूरला जाताना मिरज-पंढरपूर रेल्वेच्या पूर्व बाजूस मिरजहून २१ मैलांवर सलगरे हा गाव दिसतो. गावापासून ३ फर्लांगांवर सलगरे स्टेशन आहे. दंडोबाच्या डोंगराची रांग जेथे संपते, तेथे जवळच स्टेशन आहे व त्याच्या-पूर्वेस हा गाव आहे. प्रदेश कमी पावसाचा असला तरी गावच्या पूर्व बाजूने वाहणाऱ्या ओढ्याकाठी असलेल्या झाडीमुळे वाळवंटातील ओयासीससारखा हा भाग दिसतो व त्यामुळेही माळरानातील रुक्ष प्रदेशातून प्रवास करणाऱ्या देवाच्या गाडीतील प्रवाशांच्या मनाला सलगरे गावाबाहेरील भव्य अशी मंगलोरी कौलांची प्राथमिक शाळा, ओढयाकाठची झाडे व पलीकडील बागायती पाहून काहीसे समाधान वाटते.

## २. नवजागृत जनता

गावचे पुढारी गावकामगार विठ्ठलराव पाटील ऊर्फ दाजी यांचा वाडा गावच्या मध्यभागी उंच ठिकाणी आहे. दरवाजापुढील पायऱ्या व तेथूनच थेट पूर्वेकडे जाणारा प्रशस्त रस्ता यांमुळे दाजींचा वाडा हे गावातील एक सौंदर्यस्थळ वाटते. वाड्यात जाऊन दाजींना भेटताच प्रथम दाजींनी गृहस्थाश्रमाला अनुसरून

पाणी दिले व फार दिवसांनी वर येणं केलं ? असा प्रश्न विचारला. त्यावर मी सांगितले, दाजी, अलीकडे तुमच्या गावाने विकास-कार्यात अवघ्या महाराष्ट्रात नाव मिळविल्याचे ऐकले, वाचले. तेव्हा प्रत्यक्षच पाहून यावे म्हणून आलो. दाजी म्हणाले, कसली प्रगती! प्रतिकूल परिस्थितीत रहाणारी आम्ही माणसे. त्यात निसर्गाचा देखील आमच्यावर कोप. मेघराजा प्रसन्न झाला तर आनंद. दाजी पुढे सांगू लागले, " आमच्या वडिलांचा श्रीपती पाटलांचा खून झाला. खेड्यातील अज्ञान हेच त्याला कारण होते व त्या वेळपासून गावात कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नव्हता. मी दत्तक आलेला मला तरी कोण विचारणार! पाहुणा माणूस. परगावचा मी. पण दत्तक झालो. अर्थात् हे घर-उत्पन्न-पाटीलकी माझी झाली. तसाच गावही माझा झाला. मी मनाशी ठरविले या गावाला बदलून टाकायचे. काही नवे मित्र जोडले. योग्य मार्गाने जायचे ठरविले. हळू हळू प्रगती करायची होती मला. त्यासाठी मी प्रथम माझ्या मित्रांचा, नंतर गावाचा विश्वास संपादन केला. स्वराज्य आलं. आमचे बॅ. जी. डी. पाटील १९५२ साली या भागातून प्रथम कायदेमंडळावर निवडून आले. पंचवार्षिक योजना सरकारने आखली, आणि विकासाकडे जनतेची पावले पडू लागली. मग आम्ही एकेक पाऊल उचलले." मी विचारले, 'सुरवात कोठून केली?' दाजी म्हणाले, 'सांगतो.'

## ३. ग्रामपंचायतीची स्थापना

"पहिल्याने आम्ही १९५६ साली ग्रामपंचायतीची स्थापना केली. पहिली कमिटी बिनविरोध आली. पण गांवची आर्थिक बाजू अगदीच लंगडी. अनियमित पाऊस व जमीन माळरान यांमुळे उत्पन्न बेताचे. इतर उद्योगधंदेही काही नाहीत. यामुळे आमच्या गावचे पहिले सरपंच श्री. गंगाप्पा शिवलिंग जतकर, श्री. कृष्णा दादा जाधव, श्री. बाळासाहेब कुंडले वगैरे मंडळींनी असे ठरविले की, गावची सर्व कामे श्रमदानाने करून घ्यायची." मी विचारले, "दाजी, तुम्ही त्यात असालच ?" दाजी म्हणाले, "मी सर्व मंडळींत सततच आहे. पण मी त्यांच्या कोणत्याही कमिटीचा पदाधिकारी नाही. आम्ही सर्वांनीच एकत्र बसून श्रमदानाने करावयाच्या कामाचा आराखडा तयार केला." आम्ही असे बोलत आहोत, इतक्यात माजी सरपंच श्री. गंगाप्पा आण्णा, आजी सरपंच श्री. दत्तात्रय पाटील, श्री. जाधव वगैरे मंडळी दाजींच्या वाड्यात आली. नमस्कार वगैरे झाल्यावर दाजी म्हणाले, "गंगाप्पा आण्णा! कोकाटे साहेब मुद्दाम आपले गाव पहायला आलेत. [मी या भागाला १९५३ ते ५७ अखेर असि. डे. ए. इ. होतो] तुम्ही त्यांना ओळखताच!" "वा! नुसते ओळखत नाही. ५६–५७

साली येथील एका प्रौढ वर्गात त्यानी ‘ केलं म्हणजे होतं ’ अशी गोष्ट सांगितली होती व ती माझ्या चांगलीच आठवणीत आहे.” त्यावर मी विचारले, “ गंगाप्पा आण्णा ! तुम्ही खरोखरीच करून दाखविले. त्यामुळे तुमच्या गावचा जो लौकिक झाला, तो ऐकूनच मी मुद्दाम आलो. दाजी ! आताच आपण सांगत होता की, गांवकऱ्यांना सरपंच आदी पुढाऱ्यांनी श्रमदानासाठी हाक दिली. मग आपण गावकऱ्यांच्या मदतीने काय काय केले ? ”

## ४. पंचायत ऑफिस म्हणजेच समाजमंदिर

गावातील मुख्य रस्त्यावर भव्य आणि सर्व सुखसोयींनी सुसज्ज असे समाज-मंदिर गावाने बांधले आहे. रस्त्याकडील बाजूस उंच जोत्यावर उघडा व्हरांडा. आत भव्य हॉल. त्याच्या आत सरपंचाचे ऑफिस, ग्रामसेवक वर्गाचे ऑफिस, चावडी, वाचनालय आणि आंघोळीसाठी बाथरूम व फ्लशिंगचा संडास. सर्व इमारत सिमेंट-कॉंक्रीटने बांधलेली असून वरती स्लॅब टाकलेला आहे.

## ५. शिक्षणविषयक

गावांत मुलामुलींची एकच प्राथमिक शाळा होती. शाळेला फक्त एकाच खोलीची इमारत होती व ५ शिक्षक होते. सन १९५७–५८ पासून मुलांचा पट वाढत जाऊन हल्ली ४०० आहे. शिवाय मुलींची शाळा वेगळी असून तेथे १५० मुली आहेत आणि चाबुकस्वारवाडी म्हणून आमच्या गावची वाडी आहे, तेथे १५० मुले-मुली अशी सध्या ७०० मुले शिकतात व वाडीसह १४ शिक्षक काम करतात. वाडीसाठी ३ खोल्यांची व गावच्या मुलांच्या शाळेसाठी ७ खोल्यांची अशा दोन इमारती बांधल्या. या इमारतींसाठी चाळीस हजार रुपये खर्च झाले. गावाने आपला हिस्सा म्हणून वीस हजार रुपये खर्च केले आहेत.

**सिद्धेश्वर शिक्षणप्रसारक संस्थेचे हायस्कूल**—हायस्कूल १९५१ साली सुरू केले. पण हे प्रथम मिरजेच्या एका संस्थेने चालविले होते. त्यांना दोन हजार रुपये देणगी गावाने दिली होती; पण ती संस्था हायस्कूल चालवू शकली नाही. म्हणून आम्ही गांवकऱ्यांनीच सिद्धेश्वर शिक्षणप्रसारक संस्था स्थापन करून हायस्कूल चालू ठेवले. आता ते चांगले चालते. पटसंख्या ११० असून इयत्ता १० वी अखेर वर्ग आहेत. पुढच्या वर्षी आम्ही ११ वी सुरू करीत आहोत. या हायस्कूलपायी आतापर्यंत गावकऱ्यांनी दहा हजार रुपये खर्च केले आहेत.

**साक्षरता प्रसार**—वेळोवेळी स्त्री-पुरुषांचे वेगवेगळे प्रौढ-वर्ग चालवून निरक्षर प्रौढांना साक्षर केले आहे. जवळजवळ १४ ते ५० वयाचे बहुतेक प्रौढ स्त्री-पुरुष साक्षर होत आले आहेत. परंतु ग्रामगौरव समारंभ अजून केलेला नाही.

## ६. जोडरस्ते व गावातील रस्ते आणि गटारे

सलगरे ते स्टेशन रस्ता आणि सलगरे ते चाबुकस्वारवाडी रस्ता या रस्त्यांवर श्रमदान करून हे रस्ते तयार केले आहेत.

गावातील रस्त्यावर ठिकठिकाणी असलेली अशी ६९ अतिक्रमणे सामोपचाराने काढून टाकली व रस्ते रुंद करून घेतले. या श्रमदानाच्या कामाची किंमत अंदाजे पंधरा हजार रुपये झाली आहे.

**गटारे**--गावातील प्रमुख रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनी व्यवस्थित अशी दगडी गटारे बांधून काढली आहेत. त्या गटारांची लांबी सहा हजार फूट असून या कामी सहा हजार रुपये खर्च झालेला आहे.

## ७. आरोग्यविषयक

( १ ) **पाणीपुरवठा**--पिण्याच्या पाण्यासाठी पूर्वी चार आड होते. त्यानंतर आणखी दोन नवीन आड खोदून बांधून काढले. हे काम बोर्डाच्या ७५ टक्केच्या कामापैकी होते. गावाने आपला २५ टक्के भाग श्रमदानाने उचलला. त्याचप्रमाणे एका खाजगी विहिरीत पाणी पिण्याची सार्वजनिक अशी सोय पंचायतीने केली. पाण्यामध्ये वेळोवेळी टी. सी. एल्. व पोटॅशियम टाकून पाणी सतत स्वच्छ व जंतुविरहित राहील अशी खबरदारी घेतली जाते. जनावरांसाठी पूर्वी दोन हौद होते. आणखी नवीन ९ हौद बांधून घेतले.

( २ ) (अ) **सार्वजनिक जागांची स्वच्छता**--सार्वजनिक रस्ते व गटारे साफ करण्यासाठी पंचायतीने तीन नोकर नेमून व्यवस्था केली आहे. ते दररोज गाव स्वच्छ करतात. सार्वजनिक ठिकाणची स्वच्छताही हाच नोकरवर्ग करतो.

(ब) **मलमूत्र विसर्जन**--गावात सहा ठिकाणी मुताऱ्या बांधल्या आहेत. त्यांतून युरेन नामक उत्कृष्ट खत तयार केले जाते. ग्रामपंचायतीने साठविलेल्या केरकचऱ्याचेही खत केले जाते. तसेच मृत जनावरे कुठेही टाकून न देता त्यांचाही खतासाठी उपयोग केला जातो. असे सुमारे २०० गाडी खत दरसाल तयार होते. दरसाल त्याचा लिलाव केला जातो. हे एक पंचायतीचे उत्पादनच आहे.

( ३ ) **प्रथमोपचार पेटी**--पंचायतीने प्रथमोपचारासाठी औषधांची पेटी ठेवली असून ती औषधे सर्वांना मोफत दिली जातात.

( ४ ) **कॉलरा व एन्फ्ल्यूएंझा**—कॉलरा होऊ नये म्हणून प्रतिबंधक लस टोचण्याची व्यवस्था केली. ५८-५९ साली ११०० लोकांना टोचण्यात आले. एन्फ्ल्यूएंझा होऊ नये म्हणून ए. पी. सी. च्या गोळ्या संग्रही ठेवल्या व लोकांना वाटल्या. यामुळे साथीवर विजय मिळविता आला.

( ५ ) **सार्वजनिक संडास**—चरी पाडून चरीच्या संडासांचा उपयोग केला जातो; पण हा प्रयोग अजून चांगला यशस्वी झाला नाही.

( ६ ) **प्रसूतिगृह**--ढालगाव प्रायमरी हेल्थ सेंटरचे सब् सेंटर येथे आहे. त्याची इमारत बांधून झाली असून स्लॅब पडला आहे. येथे एक मिडवाइफ आहे. त्या गरोदर स्त्रियांचे घरी जाऊन त्यांना सल्ला देतात. त्यांना एक फीमेल अटेंडन्ट आहे. डॉक्टर आठवड्यातून एक वेळ दर सोमवारी येतात व पेशंट तपासून औषधोपचार करतात. येथील प्रसूतिग्रहात दरसाल सुमारे १२५ स्त्रिया बाळंत होतात.

( ७ ) **शिशुकल्याण केंद्र**—येथे एक बाई काम करतात, बालवाडी चालवितात. ५० मुले हजर असतात. त्यांना दररोज दूध अगर खाऊ दिला जातो. खाऊमध्ये दररोज बदल केला जातो. कधी शिरा, कधी पोहे, कधी साबुदाणा खिचडी देतात. या मुलांच्या प्रकृतीत फरक पडलेला दिसतो. या बाईही बेंझाइन, आयडिन, ए. पी. सी. इ० औषधे संग्रही ठेवून उपयोग करतात. एक सिंगर मशिन आहे, त्यावर शिवणकाम शिकवितात. खेरीज भरत-काम, विणकाम इत्यादीही शिकवले जाते. नंतर घरभेटी देतात. जमलेल्या स्त्रियांना पेपर वाचून दाखवतात. छोटे वाचनालयही त्यांनी चालविले आहे.

( ८ ) ( अ ) **गुरांचा दवाखाना**--सदर दवाखान्याचे व डॉक्टरांना रहाण्यासाठी क्वार्टरचे बांधकाम सुरू आहे. या बांधकामासाठी लोकल वर्गणी म्हणून बाराशे रुपये ग्रामस्थांनी भरले आहेत.

( ब ) **खताचे खड्डे**—गावातील खताचे खड्डे बंद करून सर्व खड्डे गावाबाहेर काढले आहेत. तेथे खत टाकले जाते.

## ८. शेतीविषयक

गावचे एकूण क्षेत्र ४३३४ एकर आहे. या भागात पुरेसा पाऊस पडत नसल्यामुळे व पावसाचे अनियमितपणामुळे हुकमी पीक शेतकऱ्याला मिळू शकत नाही. यासाठी पिकांना पाणी मिळण्याकरिता उपाय योजणे जरूर आहे म्हणून विविध प्रयत्न केले आहेत.

( १ ) **बंडिंग**—आधीच कमी पाऊस. तेव्हा पडलेल्या पावसाचे पाणी वाहून जाऊ नये यासाठी बंडिंगची योजना गावकऱ्यांनी हाती घेतली आणि अवघ्या १६ दिवसांत गावच्या सर्व ४३३४ एकर क्षेत्रात बांध घातले. जिल्ह्यात पहिल्या नंबरचे बक्षीस ( ढाल ) गावाने मिळविले.

( २ ) **शेतकरी मंडळ**—मंडळाचे अध्यक्ष श्री. दत्ताजीराव पाटील सध्याचे सरपंच असून सेक्रेटरी तुकाराम निंबाळकर आहेत. दर महिन्याला एक सभा घेतली जाते. त्या सभेत शेतीविषयक निरनिराळ्या विषयांवर चर्चा होते. शेतकऱ्यांनी सुधारलेल्या पद्धतीने शेती करावी यासाठी प्रयत्न केला जातो. टोळांचा प्रतिबंध करण्यामध्ये या मंडळाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

( ३ ) **शेतकरी नभोवाणी मंडळ**—या मंडळाची स्थापना १९-५-६० रोजी झाली. शेतकरी मंडळाचे अध्यक्ष हेच या मंडळाचे अध्यक्ष आहेत. पंचायत ऑफिसमध्ये रेडिओ बसविलेला आहे. तेथे कार्यक्रम ऐकण्यास हे लोक दररोज जमतात. कार्यक्रमातील माहितीनुसार शेतीविषयक प्रयोग केले जातात. सलगरे नभोवाणी शेतकरी मंडळ प्रगतीशील असून आक्टोबर ६१ मध्ये मंडळाचा कार्यक्रम पुणे आकाशवाणी केंद्रावर झाला होता.

( ४ ) **रुंद पेरा पद्धती**—ही पद्धती सुरू केली असून खतांचा योग्य पुरवठा केला जातो. यामुळे उत्पन्नात वाढ झाली आहे.

( ५ ) **तुकडेबंदी व तुकडेजोड**—शेतीचे लहान लहान तुकडे पडू नयेत याबाबत दक्षता घेतली आहे. तसेच लगतचे लहान लहान तुकडे एकत्र करून मोठे तुकडे करण्याचीही काळजी घेतली आहे.

( ६ ) **खतपुरवठा**—कंपोस्ट खड्डे १४२३ खणून खत तयार केले. त्या खताशिवाय सोसायटीमार्फत अमोनियम सल्फेट, नैट्रोजन ही खतेही वाटली.

( ७ ) **सुधारलेले बी व औजारांचा पुरवठा**—गहू, हरभरा यांचे सुधारलेले बी वाटले. १० लोकांना सुधारलेली औजारे वाटली व मळणीचे ४० रूळ आणले.

( ८ ) **शेती उत्पादनातील वाढ**—मिरचीचे पीक फार चांगले येते. माणसाच्या गळ्याइतकी उंच मिरचीची झाडे येतात व लालभडक अशी सुमारे १६ इंच लांबीची मिरची येते. सुधारलेल्या पद्धतीची लागण व खतांचा वापर यांमुळे केवळ मिरचीच्या पिकाच्या उत्पन्नात वीस हजारांची वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

शेतीविषयक बोलणे चालू असताना मी विचारले, 'दाजी, तुमच्या येथील काही प्रगतीशील शेतकऱ्यांची नावे आणि प्रयत्न सांगाल काय?' दाजी म्हणाले " द्या. "

| अ.नं. | शेतकऱ्याचे नाव | पिकाचे नाव | एकरी उत्पन्न |
|---|---|---|---|
| १ | गंगाप्पा शिवलिंग जतकर | मिरची | |
| २ | दत्तात्रय भाऊ पाटील | ज्वारी | ३० क्विंटल |
| ३ | नाना बाळा सावंत | ऊस | १५० गूळ ढेपा |
| ४ | बाळासाहेब लक्ष्मण कुंडले | देवीराज सी.ओ.टू.कापूस | ४८ मण |
| ५ | गाडगीळ | सर्व प्रकारची फळे | २५० केळाचे घड |

(९) **छोटे पाटबंधारे**—ओढ्यावर ठिकठिकाणी छोटे बंधारे घालून पाटाने पाणीपुरवठा करून १० एकर क्षेत्र पाण्याखाली आणले. दाजी म्हणाले, 'साहेब, फार नाही. पण पाऊस आणि पाणी नसलेल्या आमच्या प्रदेशातील हे प्रयत्न आहेत.' मी सांगितले, 'सलगरेकरांनी प्रयत्नांची शिकस्त केली आहे व हे प्रयत्न पाहून कोणीही आपणांस धन्यवादच देईल.'

(१०) **विहिरी**—१० जुन्या विहिरी दुरुस्त केल्या व १५ नवीन विहिरी काढल्या. यांमुळे बागाईत शेतीत वाढ झाली आहे. यांतील बऱ्याच विहिरींवर पंपिंग सेट व इंजिने बसवून पिकांना पाणी देण्याची सोय केली आहे.

## ९. सहकारी संस्था

(१) **विविध कार्यकारी सोसायटी**—या सोसायटीचा व्याप फार मोठा आहे. सभासदसंख्या ४७८ असून शेअर भांडवल ७१२८० रुपये आहे. सर्व सभासदांकडे साधे कर्ज व मालगहाण कर्ज मिळून सुमारे २,००,०००(दोन लाख) रुपये येणे असून त्यांत फक्त २६ सभासदांकडे ४८३५=०९ इतकीच थकबाकी आहे. थकबाकीचे प्रमाण अत्यंत अल्प असल्यामुळे सोसायटी सतत 'अ' वर्गात असते.

ही सोसायटी 'शेती मालाचे अडतविक्रीचे दुकान' आणि शेतकऱ्यांना उपयोगी अशा मालाच्या 'खरेदीविक्रीचे दुकान' चालविते. शिवाय सोसायटीने एक गोडाऊन बांधले आहे. त्यापासूनही सोसायटीला भाडे मिळते.

**निव्वळ नफा**—सोसायटीत एकंदर नोकरवर्ग ९ आहे. या सर्वांचा पगार व इतर सर्व खर्च वजा जाता या सोसायटीस सन १९६२–६३ साली १०१६७ रु. ६९ नये पैसे इतका निव्वळ नफा झाला आहे.

या सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब कुंडले हे असून सेक्रेटरी श्री. कृष्णा दादा जाधव हे आहेत. श्री. जाधव यांचेच परिश्रम ही सोसायटी वाढण्यास व सुस्थितीत राहण्यास कारण आहेत, हे नमूद करणे जरूर आहे.

( २ ) **बी.सी.क्लास फार्मिंग सोसायटी**--ही सोसायटी केवळ हरिजनांसाठी आहे. या सोसायटीचे सभासद ५५ असून सरकारने या सोसायटीला ३०८ एकर जमीन सामुदायिक शेती करण्यासाठी दिली आहे. या मंडळींनी २२५ एकर जमीन लागवडीखाली आणली आहे. सरकारकडून त्यांना ३४०० रुपये भांडवली मदत म्हणून मिळाली आहे. शिवाय सरकारकडून पहिली ३ वर्षे बी-बियाणे वगैरे मोफत मिळाले होते. सभासद मजुरांने राबतात आणि जे निव्वळ उत्पन्न राहील ते वाटून घेतात. पाण्याची सोय झाल्यास उत्पन्नात भरपूर वाढ होईल. म्हणून सभासदांनी विहीर काढली आहे. त्यांना आणखी मदतीची जरूरी आहे.

( ३ ) **सहकारी ऑइल मिल**--सलगरे, चाबुकस्वारवाडी, कोंगनोळी, कुकटोळी, सराटी, बेळंकी, जानरावावाडी, शिपूर, संतोषवाडी, कदमवाडी या गावांचे कार्यक्षेत्र असलेली सहकारी ऑइल मिल ता. ४।९।६३ रोजी स्थापन झाली असून तिचे सभासद ७०० आहेत. शेअर भांडवल आतापर्यंत ४३ हजार रुपये आहे. त्यांत सभासदांचे २७००० रुपये व सरकारचे १६००० रुपये आहेत. शिवाय गोडाऊन कर्जमदत म्हणून २००० रुपये मिळाले आहेत. गोडाऊन व मिलच्या इमारतीचे बांधकाम चालू आहे. चालू हंगामात ५००० पोती शेंग खरेदी केली असून सहकारी वर्षअखेरच्या आत गळित सुरू करण्याचा विचार आहे. सध्या श्री. गंगाप्पा शिवलिंग जतकर हे चेअरमन म्हणून काम पहातात.

‘ दाजी, याखेरीज आणखी कोणकोणत्या विकास विषयक संस्था आपल्या गावात आहेत ? ’

## १०. तरुण मंडळ

हे मंडळ १९५८ साली स्थापन झाले असून श्री. बाळासाहेब कुंडले या मंडळाचे अध्यक्ष आहेत. स्थापनेपासून नियमित खेळ खेळतात, बाहेरगावच्या सामन्यात भाग घेतात व त्यांनी सामन्यात बरीच बक्षिसे मिळविली आहेत. गावातील गणपती-उत्सव वगैरे उत्सव-समारंभात मंडळातील तरुण भाग घेतात व ते मोठ्या उत्साहाने साजरे करतात.

## ११. भजनी मंडळ

हे मंडळही १९५८ साली स्थापन झाले असून श्री. रामचंद्र बाबू शिंदे या मंडळाचे अध्यक्ष आहेत. मंडळाचे सभासद नियमित भजन करतात. विकास योजनेतून त्यांना भजनाचे सर्व साहित्य मिळाले आहे. मंडळातर्फे रामनवमी, हनुमंतजयंती इ० उत्सव साजरे केले जातात. सलगरे नभोवाणी शेतकरी मंडळाचा कार्यक्रम पुणे आकाशवाणीवर झाला. त्या वेळी होणाऱ्या कार्यक्रमात या भजनी मंडळानेही भाग घेतला होता.

## १२. महिला-मंडळ

हे मंडळ १९६० साली स्थापन झाले असून सभासद ६० आहेत. सौभाग्यवती देवकीबाई वृषभनाथ नाईक या महिला-मडळाच्या अध्यक्ष आहेत. मंडळाने स्त्रियांसाठी शिवणक्लास चालविला असून मंडळाच्या सेक्रेटरी श्रीमती प्रमिला गोपाळ संपगावकर, ग्रामसेविका सलगरे या मार्गदर्शन करतात. २५ स्त्रिया तयार झाल्या आहेत. प्रौढ महिलांना साक्षर करण्याचा वर्गही महिला मंडळात चालू असतो. शिवाय हळदी-कुंकू समारंभ वरचेवर साजरे केले जातात. पोथीवाचन चालते. करमणुकीचे कार्यक्रम केले जातात. त्यांनी या वर्षी सहलही काढली होती. त्यात ४० स्त्रियांनी भाग घेतला होता. त्या नृसिंहवाडीस जाऊन आल्या. खेरीज भरतकाम वगैरेही शिकविले जाते.

## १३. व्यायामशाळा

विकास योजनेच्या कार्यक्रमातून चार हजार रुपये खर्च करून तालीम बांधली आहे. तिचा फायदा सुमारे २५ तरुण मुले घेतात. अजून नाव घेण्यासारखा एखादा मल्ल तयार झालेला नाही. पण होईल अशी आशा आहे. अर्थात् या कामातील गावचा वाटा गाववर्गणीतून गावाने उचलला आहे.

## १४. वीजपुरवठा

गावासाठी पंचायतीने प्रयत्न करून विजेसाठी मंजुरी मिळविली. त्यामुळेच हल्ली गावभर रस्त्यांवर विजेचा लाईट दिसतो. खेरीज बऱ्याच मंडळींनी आपल्या घरातही विजेचे दिवे घेतले आहेत.

## १५. कुटुंबनियोजन

कुटुंब-नियोजनाचे शिबीर येथे घेतले होते. त्या शिबिराचे वेळी चाळीस पुरुषांनी ऑपरेशन करून घेतले आहे. एकंदरीत या सुधारणेस लोक अनुकूल होत चालले असून दुसऱ्या संधीची वाट पहात आहेत.

## १६. अस्पृश्यतानिवारण

सार्वजनिक मंदिरे, विहिरी, हॉटेले, हेअर कटिंग सलून इ० हरिजनांना खुली केली असून वरचेवर सहभोजनाचे कार्यक्रम केले जातात.

## १७. दारूबंदीत वाढ

दारूबंदी समिती गावात स्थापन केली असून, पूज्य स्वामी रामानंद भारती यांच्यासमोर दारू पिणाऱ्या लोकांनी शपथा घेतल्या व दारूबंदीची योजना यशस्वी केली आहे.

## १८. लाचलुचपत निर्मूलन

लाचलुचपत-विरोधी प्रचार करून कोणत्याही सरकारी कामाबाबत पैसे न देण्याविषयी लोकांना सांगितले व लाच न देण्याची प्रथा सुरू केली आहे.

## १९. कत्तलखाने सुरक्षित ठेवणे

कत्तलखान्यासाठी बंदिस्त व स्वच्छ खोल्या बांधून गावाबाहेर थोड्या अंतरावर हा कत्तलखाना ठेवला आहे.

## २०. बचतग्राम

बचत-योजनेचे महत्त्व लोकांना पटवून सांगितले. त्याचा परिणाम म्हणून २६ जानेवारी या एकाच दिवशी सर्व गाव बचतग्राम करून उच्चांक स्थापन केला आहे.

## २१. निरर्थक खटले व दावे यांपासून लोकांना परावृत्त केले

निरर्थक खटले व दावे यांपासून लोकांना परावृत्त केले. किरकोळ तक्रारी गावातच आपसात मिटविल्या. आपसात मिटविलेल्या खटल्यांची संख्या ५० आहे. आमच्या गावातील कूळकायद्याची एकही केस कोर्टात गेलेली नाही.

## २२. बेकारीनिवारण

ज्यांना कामधंदा नाही अशा बेकारांची नोंद पंचायतीमध्ये ठेवलेली आहे. विशेषतः मागासलेल्या व गरीब लोकांची निवड करूनच पंचायतीमार्फत चाल-लेल्या कामावर वेळोवेळी नेमून घेतलेले असून त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय केली आहे. त्यामुळे त्यांची परिस्थिती सुधारली आहे.

## २३. ग्राम व पीकसंरक्षण

होमगार्ड शिबिरात शिक्षण घेऊन दोन तरुण आले आहेत. गावात गस्त घालण्यासाठी गुरखा नेमून गस्तीची व्यवस्था केली आहे.

सलगरे गावात ज्यांचा शब्द खाली पडू दिला जात नाही, असे गावचे पुढारी श्री. विठ्ठलराव पाटील ऊर्फ दाजी यांना शेवटी असे विचारले की, ' दाजी, आपण गावात कोणतीच सुधारणा करण्याचे ठेवलेले दिसत नाही. ' त्यावर दाजी म्हणाले, " अजून आम्हांला पुष्कळ गोष्टी करावयाच्या आहेत. " ' त्या कोणत्या ? ' ' सांगतो ' म्हणून त्यांनी सुरवात केली.

## २४. संकल्प

( १ ) अपुरे असलेले हायस्कूल ११ इयत्ता सुरू करून पूर्ण करणे व हायस्कूलसाठी एक प्रशस्त इमारत बांधणे. ( २ ) प्राथमिक शाळेसाठी दगड काढलेल्या खाणीला खूप पाणी लागले आहे. ती विहीर वाढवून तेथे विजेची मोटार बसवून उंच ठिकाणी पाण्याची टाकी बांधून नळाने गावाला घरोघर पाणीपुरवठा करणे. ( ३ ) निरक्षर प्रौढांची खाने-सुमारी करून राहिलेले सर्व लोकांना साक्षर करून ग्रामगौरव समारंभ घडवून आणणे. ( ४ ) फ्लशिंगचे संडास बांधणे. पाण्याची सोय झाल्याशिवाय ते करता येणे शक्य नाही. इतर प्रकारचे संडास लोक वापरू शकत नाहीत. पाटीच्या संडासासाठी लागणारे भंगी मिळणे कठीण आहे म्हणून फ्लशिंगचे संडास बांधणेच जरूरीचे आहे व पाण्याची सोय आणि संडास आम्ही एकाच वेळी करणार आहोत.

## २५. सलगरे गावच्या विकासाची प्रेरणा

' दाजी ! तुमच्या गावाचे विकासाचे बरेचसे श्रेय तुम्ही आणि तुमचे सहकारी मित्र श्री. गंगाप्पा अण्णा जतकर, श्री. बाळासाहेब कुंडले, श्री. दत्ताजीराव पाटील, श्री. कृष्णा दादा जाधव इत्यादी मंडळींनाच दिले पाहिजे. '

दाजी म्हणाले, " हे तर खरेच, पण या विकासाच्या यशातील आमचे दोन फार मोठे हिस्सेदार आहेत. त्यांचे श्रेय त्यांना दिले पाहिजे; आणि ते म्हणजे एक आमच्या गावचे या विकासकाळातील ग्रामसेवक श्री. जगौंडा आदगौंडा पाटील आणि दुसरे म्हणजे आमच्या कवठेमहांकाळ भागाचे आमचे प्रतिनिधी बॅ. नामदार जी. डी. पाटील, उपमंत्री नियोजन आणि उद्योगखाते महाराष्ट्रराज्य हे दोन होत. नवीन नवीन योजना आम्हांला सांगणे, उत्तेजन देऊन आमच्याकडून अमलात आणणे आणि त्या कामी जरूर ते साहाय्य करणे या गोष्टी जर बॅरिस्टर साहेबांनी केल्या नसत्या, तर मार्गदर्शनाच्या अभावी आम्ही एवढी प्रगती करूच शकलो नसतो आणि म्हणून आम्ही त्यांना आमच्या सलगरे गावच्या विकासाची प्रेरणा मानतो.

## २६. गावाने मिळविलेली बक्षिसे

" ग्रामा-विकासाबाबत तुम्ही सलगरे गावाने काही स्पर्धांत भाग घेऊन तुम्हांला बक्षिसेही मिळाली असतील ? " दाजी म्हणाले, " हो तर. "

| अ. नं. | स्पर्धेचे नाव | विषय | बक्षीस |
|---|---|---|---|
| १ | बंडिंग जिल्ह्यात पहिला | बंडिंग करणे | जि. पहिला नंबर ढाल |
| २ | वनमहोत्सव | झाडे लावणे ५८-५९ दुसरा नंबर | रोख १०० रु. |
| ३ | ग्रामपंचायत स्पर्धा | ५८-५९ पहिला नंबर | रोख २००० रु. |
| ४ | मुंबई राज्यात गाव-स्पर्धा | ५९-६० मुंबई राज्यात एक नंबरचा गाव | रोख १००० रु. |
| ५ | मुंबई राज्यात ग्राम-सेवक | ५९-६० राज्यात एक नंबरचा ग्रामसेवक | बाजीराव पाटील रोख १००० रु. |
| ६ | महाराष्ट्र राज्यात गाव व ग्रामसेवक | ६०-६१ महाराष्ट्र राज्यात गाव व ग्राम-सेवक पहिला नंबर | ग्रामसेवक लॅम्ब्रेटा स्कूटर<br>गाव रोख १००० रु. |

## २७. गावाने सरकारमदतीने विकासकार्यावर केलेला खर्च

| अ. नं. | कामाचे नाव | एकूण खर्च | गावाने केलेला खर्च |
|---|---|---|---|
| १ | मुलांसाठी प्राथमिक शाळा चाबुकस्वारवाडीसह | ४०,००० | २०,००० |
| २ | सोसायटी ऑफिस व गोडाऊन | | १५,००० |
| ३ | गावातील सार्वजनिक रस्ते | | १५,००० |
| ४ | गावातील गटारे | | ६,००० |
| ५ | हायस्कूल | | १०,००० |
| ६ | गुरांचा दवाखाना | | १,२०० |
| ७ | समाजमंदीर | | |
| ८ | ग्रामसेवक क्वार्टर्स | | |
| ९ | पिण्याच्या पाण्याचे आड | | |
| १० | बंडिंग | | |
| ११ | अप्रोच रोडवरील काम | | |
| १२ | प्रसूतिगृह | | ३,००० |

अशा या भाग्यशाली गावात सर्व शेतकरी बंधुभावाने नांदतात. ज्या श्रीपती पाटलांचा खून झाला, त्याच श्रीपती पाटलांचे चिरंजीव विठ्ठलराव पाटील हे गावचे एकमेव नेते बनले आहेत. या नेत्यावर गावचा पूर्ण विश्वास आहे. त्यांच्या हाकेला मध्यरात्री सुद्धा सारा गाव ओ देतो व धाऊन येतो. गावात औषधालाही दुफळी नाही. श्रमदानासाठी २५ गाडया बोलावल्या तर ५० गाडया जोडून तयार असतात. जादा आलेल्या २५ गाडयांना ' तुम्ही परत जा ' असे सांगावे लागते. यावरून केवढा मोठा उत्साह गावात निर्माण झाला आहे, याची कल्पना येते. तीन वर्षांपूर्वी लावलेल्या रोपाच्या डेरेदार विकासवृक्षाच्या गार छायेत गाव समाधानाने नांदतो आहे. हे पाहून मोठया जड अंतःकरणाने रात्री सर्व पुढाऱ्यांचा निरोप घेतला. वाटले, इतका विकास ज्यांनी साधला ते आपला संकल्प पूर्ण करतीलच ! म्हणून त्यांना मानाचा मुजरा करून निरोप घेतला.

---

विकासयुगात कायापालट झालेले

# बावची

★

## प्रगतीचे शिखर गाठणारे खेडे

स्वातंत्र्य-लढ्यात साताऱ्याने संस्मरणीय इतिहास निर्माण केला. स्वातंत्र्या-साठी प्राणार्पण करणारी माणसे जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात धगधगत होती. वाळवा तालुका आघाडीवर होता. तुफान सैनिकदलातून अनेक क्रांतिवीर निर्माण झाले होते. त्या वेळी बावची वाळव्याच्या परंपरेत आघाडीवरच होती. नाव गाजले पण गाव होते तसेच राहिले.

महाराष्ट्रातील खेड्यांत दिसणारे हेवेदावे, अरेरावीपणा, गुंडांचा दबाव, निरुत्साहीपणा, ऐक्याचा संपूर्ण अभाव या परिस्थितीमुळे दरसाल आगी, मारामाऱ्या, खून यांना ऊत आला होता. माणसांचे जीवित व वित्त धोक्यात होतेच, पण उभे पीक, पशुधन हे देखील धोक्यात होते ! सरकारी अधिकारी-वर्ग देखील हवालदील होऊन बावचीच्या सुधारणेबाबत हताश झाला होता. या गावातली माणसं स्तब्ध होती. बाहेरच्या जगाशी संबंध ठेवणेही त्यांना रस्त्याच्या अडचणीमुळे शक्य नव्हते. बावची-अष्टे रस्त्यात तसेच बावची ते अष्टे-इस्लामपूर रोडकडे जाणाऱ्या रस्त्यात भरपूर चिखल आणि बावची-फाळकेवाडी आणि

बावची-गोटखिंडी इकडे जाणारे रस्तेही खाचखळग्यांनी भरलेले. अशा रीतीने चोहोंकडून अडचणीत असलेले बावची गाव कधीकाळी सुधारेल असे कोणीही मानीत नव्हते. आर्थिक दृष्टीने पाहिले तर शेती निसर्गाने पडणाऱ्या पावसावर अवलंबून. विहिरीचे बागायत थोडे. त्यातही वरवंटा पडला, मखर मोडले, बैल थकला अशा अनंत अडचणी. पिण्याच्या पाण्याची चांगली सोय नाही. यामुळे बहुतेक माणसे नारूने आजारी पडून पायाला फडके बांधून लंगडत असलेली. एका खोलीची जुनी शाळा व बाकीचे वर्ग देवळात. बाजार भरत नव्हता. चोहोकडून गावची केविलवाणी परिस्थिती होती.

## विकासाची चाहूल

स्वातंत्र्यानंतर देशात पंचवार्षिक योजनांचे युग सुरू झाले. विकासाचे वारे वाहू लागले. लोकांच्या बोलण्यात व ऐकण्यात योजना येऊ लागल्या. कोठे शाळा बांधली, कोठे तलाव बांधला, कोठे आरोग्यकेंद्रे उघडली. एक ना दोन. अनेक गोष्टी कानावर येऊ लागल्या.

## बावची बदलू लागली

बावचीचे पुढारी विठ्ठलराव यादव ऊर्फ दादा यांना विचारले, 'दादा, अशा बिकट परिस्थितीत असताना बावचीत एवढा कायापालट तुम्ही कसा काय घडवून आणला?' त्यावर दादा म्हणाले, 'याचे सर्व श्रेय माझे सहकारी श्री. विष्णू महादेव यादव, श्री. बाबूराव बाळा शिंदे, श्री. पांडुरंग नाना रकटे, श्री. कुतुबुद्दीन आदम मुल्ला, श्री. तय्यबअली आब्बास चौगुले, श्री. गणपती बळी तळप इत्यादि मित्रांना आहे. आम्ही एकत्र आलो. संघटना केली. गावच्या गरजांची नोंद केली, गावची म्हणून एक योजना आखली आणि गरजा भागविण्यासाठी साधनांची शोधाशोध सुरू केली व कामाला लागलो.

## सर्व सुधारणांचे मूळ शिक्षण

शिक्षणाला अग्रहक्क दिला. कारण गावच्या विकासाचा शिक्षण हा मानबिंदू आहे. माणसे सुधारणेचे काम हे लोकशाहीतले पहिले काम आहे. त्यामुळेच लोकशाही सुधारणार! म्हणून प्रथम प्राथमिक शाळेसाठी १७ खोल्यांची भव्य इमारत बांधली. त्यासाठी ५८००० रुपये खर्च आला. त्यातील ग्रामस्थांनी २० हजार रुपये घातले. हल्ली शाळेत ४७५ मुले शिकतात व १३ शिक्षक काम करतात. आमच्या शाळेचे ७ वीचे रिझल्ट सतत ९० टक्क्यांवर लागतात. १९६३ साली आमच्या गावचा मुलगा केंद्रात पहिला आला. मुलींची शाळा

परि क्रम ५.४६०... नों. कि. २५/३/७५
२०७६



स्वतंत्र असून २७० मुली शिकत आहेत व ७ शिक्षक तेथे काम करतात. मुलांच्या शाळेच्या आवारात ओपन एयर थिएटर बांधले असून तेथे वरचेवर सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात. शिवाय क्राफ्ट शेड बांधली असून दोन लेडीज क्वार्टर्स बांधल्या आहेत.

**प्रौढ शिक्षण**--प्रौढांना साक्षर करण्याचे कठीण कामही पार पाडले असून स्त्रियांचे २२ व पुरुषांचे ४ असे सव्वीस प्रौढवर्ग चालवून बावचीच्या ४३४४ लोकसंख्येपैकी १४ ते ५० वयाचे जे ७५० स्त्री-पुरुष निरक्षर होते, त्यांना साक्षर करून नुकताच ग्रामगौरव समारंभ साजरा केला. हा वाळवे तालुक्यातील पहिला मान आमच्या गावाने मिळविला.

**ग्राम-वाचनालय**—साक्षरता टिकवण्यासाठी व एकंदरीत लोकांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी वाचनालय चालविले असून विविध विषयांवरील ८०० पुस्तके वाचनालयात आहेत. शिवाय-किर्लोस्कर, स्त्रीसारखी मासिके आणि विशाल सह्याद्री, पुढारी, महाराष्ट्र टाइम्स, नवसंदेश इ० दैनिके नियमितपणे घेतली जातात व त्यांचा फायदा ग्रामस्थ घेतात.

**शिवाजी हायस्कूल**--ना० राजारामबापू पाटील यांनी स्थापन केलेल्या कासेगाव एज्युकेशन सोसायटीचे शिवाजी हायस्कूल १९६१ साली सुरू केले असून तेथे हल्ली १० वी अखेरचे वर्ग चालू आहेत. विद्यार्थ्यांची संख्या ११५ असून त्यांत २५ मुली आहेत. चला, तुम्हांला आमचे हायस्कूल दाखवितो म्हणून दादा उठलेच ! मीही त्यांच्याबरोबर गेलो. विशेष हा की, हायस्कूलची इमारत साधीच व मंगलोरी कौलांची असली तरी त्या इमारतीचे बहुतेक काम मुले आणि ग्रामस्थ यांनी श्रमदानांनी केले आहे. पुढील वर्षी ११ वी अखेरचे वर्ग निघून हायस्कूल पूर्ण होईल. या हायस्कूलचे सुरवातीस संस्थेला दोन हजार रुपये ग्रामस्थांनी मदत दिली आहे. दादा म्हणाले, आमच्या गावातील बऱ्याच सुधारणांचे श्रेय ना० राजारामबापू यांना आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ते आमचे स्फूर्तिस्थान आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९३६०८

## जोडरस्ते व गावातील रस्ते

कोठल्याही गावाला शेजारच्या गावाशी किंवा बाहेरच्या जगाशी संबंध ठेवायचा असेल तर रस्त्यांची फार जरूरी असते. म्हणून बावचीचे विठ्ठलराव दादा म्हणाले, “ रस्त्याच्या कामाला आम्ही दुसरा क्रमांक दिला.” मी म्हणालो, “ दादा, तुम्ही मंडळींनी ही फार चांगली गोष्ट केली. ” त्यावर दादा म्हणाले, “ अहो कोकाटेसाहेब ! अङ्ख्याच्या बाजूला जाणाऱ्या पांदीतील चिखल आणि

अष्टे-इस्लामपूर रस्त्याचे बाजूला जाणाऱ्या रस्त्याच्या चिखलाची कल्पना तुम्हांलाही थोडीबहुत असेल. या दोन्ही बाजूला जाणाऱ्या चिखलात रुतलेल्या गाड्यांना काढण्यासाठी म्हणून कितीतरी कष्ट पडत. कित्येक वेळा बैल गांगरून जाऊन चिखलात बसत व मग तर ती गाडी आणि बैल काढणे महाकर्म कठीण होऊन बसत असे. म्हणून या सर्व रस्त्यांवर सुमारे ६५००० रुपये किंमतीचे काम आम्ही गावकऱ्यांनी केले. यात कधी ५० टक्के तर कधी ७५ टक्के मदत सरकारकडून मिळाली होती. हे एकंदर ४ मैलांचे, शिवाय गावात पंचायत निधीतून १॥ मैल लांबीचे रस्ते केले आहेत. सरकारी मदतीखेरीज जोडरस्त्यासाठी रोख व श्रमदान मिळून १५ हजारांचे काम ग्रामस्थांनी केले. यामुळे सध्या या रस्त्यावरून एस. टी. ची सर्व्हिस सुरू झाली आहे.

## सहकारी संस्थांचा पसारा

रस्ते पाहून झाल्यावर बोलत बोलत आम्ही सोसायटीत आलो. दादा म्हणाले, ' ही आमची पूर्वभाग सोसायटी. ' मी विचारले, ' दादा, ही पूर्वभाग म्हणजे आणखी एकादी सोसायटी आहे वाटते?' दादा म्हणाले, ' एक का? पश्चिम भाग विविध सहकारी सोसायटी, हौसिंग सोसायटी, धान्य सोसायटी, भाजीपाला सोसायटी, खाख उत्पादक सोसायटी अशा एकूण ६ सोसायट्या आहेत. आमच्या गावातील बहुतेक कुटुंबप्रमुख या ना त्या सोसायटीचे सभासद आहेत व ही मंडळी सोसायटीच्या द्वारा आपल्या नित्याच्या गरजा भागवितात.'

पूर्वभाग व पश्चिम भाग विविध सहकारी सोसायटींमधून शेतकऱ्यांना पीक उत्पादन वाढविण्यासाठी कर्जपुरवठा होतो. शिवाय शेतीसाठी लागणारी अवजारे आणि रासायनिक खते, विहिरीवरील एंजिनसाठी लागणारे क्रूडॉइल, मोबाईल, तसेच नित्य उपयोगी रॉकेल, गोडेतेल, पेंड इत्यादी वस्तूंचा पुरवठाही केला जातो. स्वस्त धान्याचे दुकानही एका सोसायटीने चालविले आहे. मी म्हणालो, " दादा ! तुमच्या गावाला लागणाऱ्या सर्व वस्तू तुम्ही सोसायटी-मार्फतच घेता म्हणायच्या. आता फक्त कापडच तेवढे सहकारी दुकानातून घेण्याचे राहिलेले दिसते." दादा म्हणाले, " काय म्हणून ! अहो कोकाटेसाहेब, सहकारी कापड दुकानची आमची तयारी असून सर्व योजना झाली आहे. यंदाच्या पाडव्याच्या मुहूर्तावर सहकारी कापड दुकान सुरू होईल. सोसायटीचा माल साठविण्यासाठी २० हजार रुपये किंमतीचे गोडावून बांधले आहे."

घरबांधणीसाठी हौसिंग सोसायटी ही मागासलेल्या लोकांसाठीच सुरू केली आहे. प्रारंभी एक एकर जागा घेऊन त्यात सुरुवात केली आहे. २ घरे तयार झालीत, चार तयार होण्याच्या मार्गावर आहेत व २२ प्लॅन इस्टिमेट्स

तयार आहेत. सभासदसंख्या वाढू लागल्यामुळे आणखी ३ एकर जागेची मागणी केली आहे. सुमारे दीड हजार रुपये किंमतीत प्रशस्त व हवेशीर असे छोटे घर पाहून आनंद वाटला. या सोसायटीचे काम कृष्णाजी भिवराव यादव गेली ४ वर्षे ऑननरी पाहतात.

**धान्यभिशी**—ही एक अनरजिस्टर अशी सोसायटीच आहे. हिचे चालक श्री. शंकरराव पाटील पोखर्णीकर आणि त्यांचे १५ सहकारी आहेत. या तरुण मंडळींनी गावातील गरीब लोकांजवळ वर्षअखेरच्या दिवसांत धान्य नसते व गावातील बडे लोक त्यांच्या गरिबीचा गैरफायदा घेतात. म्हणून १५ सभासदांनी प्रत्येकी २ पोती याप्रमाणे ३० पोती धान्य जमविले आणि ते गरीब व गरजू लोकांना वाटले आणि आता सुगीचे वेळी सवाईने वसूल केलेले दिसले. आता हे वाळवून स्वच्छ करून पुढच्या वर्षी परत वाटायचे असा त्यांचा विचार दिसला.

**भाजीपाला सोसायटी**—बावची गावचा पूर्वभाग, अष्टे हद्दीतील शिंदे मळा विभाग व फाळकेवाडी अशा हद्दीतील भाजीपाला पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना सभासद करून घेऊन ही सोसायटी बनविली आहे. हिचे सभासद ११७ आहेत. या सर्वांचा भाजीपाला एकत्र करून सांगली मार्केटला दररोज पाठविण्याची व्यवस्था केली आहे. यामुळे मालाला चांगले गिऱ्हाईक मिळते व शेतकऱ्यांना घरी बसून पैसा हाती येतो.

**वाख उत्पादक सोसायटी**—पाच एकर जमीन घेऊन तेथे घायपाताची लागण केली असून वाख तयार केला जातो व त्याचे दोर वळून ते सांगली–कोल्हापूर बाजारपेठेत विकण्याची व्यवस्था केली आहे.

## आरोग्यविषयक सोयी

सोसायटींची माहिती घेऊन बाहेर पडल्यानंतर थोडे पुढे गेल्यानंतर एक इमारत दिसली. मी विचारले, “दादा, ही कसली इमारत?” दादा म्हणाले, “चला, आपण तेथे जाऊनच पाहू या.” दादा बोलू लागले, हे आमच्या गावचे आरोग्यकेंद्र. या केंद्रासाठी आठ हजार रुपये खर्च झाला. येथे बालवाडी चालविली जाते. लहानलहान मुलांना दूध दिले जाते. त्यांना खेळण्यासाठी व्यवस्था आहे. जोडूनच प्रसूतिगृह चालविले जाते. प्रसूतिगृह १९५५ साली सुरू केले. प्रथम बाळंतिणी मिळवाव्या लागत असत. आता ६ कॉट्स् आहेत व आगाऊ नाव नोंदल्याशिवाय कॉट मिळणे कठीण पडते. सध्या येथे १५० ते २०० बाळंतपणे दरसाल होतात. मी म्हणालो, ‘मग येथे नर्सेसचा स्टाफही

बराच असेल आणि खर्चही बराच येत असेल. तो तुमच्या ग्रामपंचायतीला परवडतो का ?' ' थांबा सांगतो. १ ट्रेंड दायी, २ आया, १ ग्रामसेविका अशी मंडळी येथे काम करतात. या मंडळींचे पगार, इतर खर्च वगैरे सर्व समाज-कल्याण केंद्रामार्फत चालतो. आमची ग्रामपंचायत दरसाल फक्त एक हजार रुपये ग्रँट देते. सुरवातीस प्रसूतिगृह चालविण्यास पाच हजार रुपये मदत ग्रामस्थांनी केली आहे. आमचे येथील प्रसूतिगृह इतके यशस्वी झाले आहे की, अष्टेसारख्या म्युनिसिपालिटी असलेल्या मोठ्या शहरातील श्री. दोड्डमनी फौजदारांची बायको, डॉ. शेंडगे यांच्या पत्नी येथे बाळंतपणासाठी आल्या होत्या. खेरीज शेजारचे वाळवे, खेड इत्यादी गावच्या बायकाही येथे येतात.'

**कुटुंबनियोजन**— नंतर मी विचारले, "दादा, कुटुंबनियोजनाचे बाबतीत तुमच्या बावचीची प्रगती कशी काय ?" दादा म्हणाले, याही बाबतीत आम्ही मागे नाही. एकंदर ७ शिबिरे येथे झाली. पहिल्या शिबिरात सर्व-प्रथम मी आपले ऑपरेशन करून घेतले. यामुळे लोकांत विश्वास आला व मग हळूहळू ऑपरेशन्स होऊ लागली. आतापर्यंत गावातील १०० पुरुष व ७ स्त्रियांनीही ऑपरेशन करून घेतले आहे. या भागातील इतर गावच्या एकंदर ४०० लोकांनी येथे येऊन आपरेशन्स करून घेतली आहेत.

## पिण्याच्या पाण्याची सोय

आरोग्यकेंद्रातून बाहेर पडल्यानंतर दादांनी आम्हाला एका बंद पायऱ्या असलेल्या आडावर नेले. मी म्हणालो, " बांधकाम छान दिसते आणि पाणी भरपूर आहे." दादा म्हणाले, ' होय. सर्व आडांना गोडे पाणी लागले आहे. अहो साहेब ! एक काळ असा होता की, उन्हाळ्याचे दिवसांत पायाला नारू झाल्यामुळे फडके बांधून हातात काठी घेऊन लंगडत चालणारी किमान ५०० माणसे दिसत. एक घर असे नसे की, तेथे नारूने कोणी आजारी पडला नाही. हे आड झाल्यापासून मात्र नारूचा एकही आजारी आमच्या गावात दिसत नाही. यासारखे ९ आड आम्ही गावात काढून बांधून घेतले आहेत.' ' अरे बापरे ! मग तुम्हांला बराच खर्चही आला असेल.' दादा म्हणाले, " होय, ऐंशी हजार रुपये आम्ही खर्च केले. या कामी आम्हांला ७५ टक्के मदत विकास-योजनेतून मिळाली व बाकीचे ग्रामस्थांनी श्रमदान केले."

**पाझर तलाव**— यानंतर दादांनी आम्हांला गावचे दक्षिण भागात नेले. जवळजवळ गावाबाहेरच पडलो. "अहो दादा ! इकडे कोणीकडे ?" दादा म्हणाले, " आमचा तलाव तर पहा." तलावाच्या काठावर उभे राहून पाहाताना एक

प्रकारचा आनंद वाटला! दादा बोलू लागले, "या तलावासाठी आम्हांला सव्वीस हजार रुपये लागले. शिवाय ग्रामस्थांनी श्रमदानही बरेच केले आहे. हल्ली या तलावातील पाण्याचा उपयोग जनावरांना व कपडे धुण्यासाठी होतो. शिवाय हा तलाव झाल्यापासून सखल भागातील विहिरींना पाणीही सुटले आहे."

**शेती सुधारणा**—"दादा! आता तुमच्या गावाने शेती-विषयक केलेली प्रगती मला पहायची आहे?" यावर दादा म्हणाले, याही बाबतीत सर्व-सामान्य प्रयत्न चालू आहेत. भाजीपाल्याबाबत मघा मी बोललोच! इतर बागायत म्हणजे ऊस, केळी, मिरची इत्यादी पिके आमच्या येथे होतात. ५० नवीन विहिरी काढल्या असून त्यावरही बागायत पिके आमचे ग्रामस्थ घेऊ लागलेत. इतके दिवस आईल इंजिनने पाणी काढले जात होते. आता वीज आल्यामुळे विजेची लाईन रानात विहिरीवर ओढली जात असून लौकरच विजेच्या मोटारच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा होईल. श्री. पांडुरंग रकटे, श्री. गणपती तळप, श्री. निवृत्ती कोकाटे, श्री. ज्ञानू लाटणे, श्री. कुतुबुद्दीन मुल्ला यांची शेती पहाण्यासारखी आहे. ज्वारीच्या बाबतीत टोकण पद्धतीचा वापर केल्यामुळे एक गुंठ्याला एक पोते (१ क्विंटल) ज्वारी काढू शकतील. तसेच एकरी ४० ते ५० टन ऊसही येथे पिकतो. पण आमचा गाव शेजारच्या कोणत्याच सहकारी साखर कारखान्यात नाही. दादांना या गोष्टीची मोठी खंत वाटल्याचे दिसले. योग्य वेळी आमचे शेतकरी रासायनिक खते वापरतातच. शिवाय कंपोस्टखताचे दरसाल सुमारे १५० खड्डे भरले जातात. गावातील बरेच खताचे खड्डे गावाबाहेर नेले आहेत.

## गावाने केलेली इतर महत्त्वाची कामे

**समाजमंदिर**—या मंदिरासाठी एकुण बारा हजार रुपये खर्च आला. या इमारतीत चावडी, ग्रामपंचायत, वाचनालय यांच्यासाठी स्वतंत्र खोल्या असून शिवाय २५′ × २२′ असा एक सभाहॉल बांधला आहे. पुढे छोटासा व्हरांडा ठेवला असून समोर खूप मोठे खुले मैदान आहे. या मैदानात जाहीर सभा घेतल्या जातात. पंचायत ऑफिसमध्ये रेडिओ ठेवला असून लाऊड-स्पीकरच्या सहाय्याने रेडिओवरील प्रोग्रॅम ग्रामस्थ मंडळी मैदानात बसून ऐकत असतात.

**लाइटची सोय**—गावात विजेच्या दिव्यांची सोय १९६० साली करून घेतली असून ग्रामपंचायत ऑफिसमधील व रस्त्यावरील दिव्यांचा लाइटखर्च

दरसाल सुमारे दीड हजार रुपयेपर्यंत पंचायत करते. प्राथमिक खर्च म्हणून पाच हजार रुपये आम्हांला भरावे लागले.

**व्यायामशाळा**--पाच हजार रुपये खर्चून तालीम बांधली आहे. हे ५० टक्क्यांचे काम होते. अर्थात् या कामासाठी ग्रामस्थांना सुमारे अडीच हजार रुपये खर्च करावे लागले. सध्या रंगराव माळी, सर्जेराव माने, ज्ञानू खोत, पांडुरंग ढोकळे ही नाव घेण्यासारखी पहिलवान मंडळी आहेत. इतरही २०।२५ तरुण मुले व्यायामशाळेचा फायदा घेतात.

**महिलामंडळ**—१९५७ सालापासून महिलामंडळ गावात कार्य करीत आहे. सभासद ६९ आहेत. मराठ्यांच्या बायकांनी गोषा टाकून दिला आहे. घराघरांत प्रचार करून साक्षरताप्रसार केला, दारूबंदीबाबत घराघरांत प्रचार करतात. अस्पृश्यता निवारणाच्या कामात भाग घेतात. हरिजन वाड्यात जाऊन तेथील महिलांना स्वच्छता कृतीने करून दाखवून त्यांच्या मुलींच्या वेण्या घालणे इ० कामे प्रत्यक्ष करून दाखवितात. इतर वेळी लोणची, पापड, कुरडया इ० पदार्थ करण्याचे त्यांचे काम चालू असते. पोथी-वाचनाचे, भजनाचे कार्यक्रमही चालतात.

**तरुण मंडळ**—याचे शंभर सभासद आहेत. वर्षांतून दोन मोठ्या सभा घेतात. गावात ऐक्य राखणे, विकासासाठी श्रमदान करणे, सत्प्रवृत्ती वाढविणे, असत् प्रवृत्तींना रोखणे इ० कामे हे मंडळ करीत असते.

**होमगार्ड संघटना**—होमगार्डचे एक पथक असून त्यांत ४२ मंडळी शिक्षण घेऊन तयार झालेली आहेत. आणीबाणीच्या काळात शांतता आणि सुव्यवस्था राखण्याच्या कार्याची जबाबदारी त्यांनी उचलली आहे.

**भजनी मंडळे**—सांस्कृतिक दृष्ट्या करमणूक करून त्याद्वारा शिक्षणाचे काम करणारी २ भजनी मंडळे आहेत.

**नाट्यमंडळे**—हौसी नटांची तीन नाट्यमंडळे असून ऐतिहासिक व सामाजिक नाटके करून लोकरंजनाचे कार्य ही मंडळे करीत असतात. गेल्या वर्षी एकंदर आठ नाटके त्यांनी करून दाखविली.

**नभोवाणी शेतकरी मंडळ**—हे सुरू होऊन ६ सहा महिने झाले. सभासद ऐंशी असून ते रेडिओ कार्यक्रम ऐकण्यासाठी चावडीवर जमतात. प्रश्नोत्तरांतून मिळणाऱ्या ज्ञानाचा फायदा घेतात.

**न्यायदान मंडळ**—गेली दहा वर्षे ग्रामपंचायतीत न्यायदानमंडळ आहे. गावातील बऱ्याच तक्रारी आपसात तडजोड करून मिटविल्या जातात. रेकॉर्डवर ५ केसीस खटला चालवून निकाल घेतलेल्या आहेत. त्यांपैकी चारांनी निकाल मानले. फक्त एकानेच अपील केले असून ते हायकोर्टाला चालून पंचायतीने दिलेला निकाल कायम करण्यांत आला. लौकरच न्यायपंचायत सेंटर बावचीस चालू होणार असून त्यात शिरगाव, वाळवे, गोटखिंडी, पोखर्णी व बावची ही गावे रहाणार आहेत व कामकाज बावचीतून चालणार आहे.

**जातिनिर्मूलन कार्य**—" दादा ! तुमच्या गांवांत तुम्ही बऱ्याच सुधारणा केलेल्या दिसतात. एक विचारू का ? तुमच्या गावात जातिनिर्मूलनाच्या दृष्टीने काही प्रयत्न झालेत का ? " दादा म्हणाले, " चांगला प्रश्न विचारलात ! हा तर गावच्या सुधारणेतला सर्वांत महत्त्वाचा भाग." दादांनी प्रत्यक्ष चाललेल्या कामाचे फोटोच दाखविले व दादा म्हणाले, आमच्या येथे अस्पृश्यता मुळीच पाळली जात नाही. हरिजन मंडळी कोठेही पाणी भरूं शकतात. मधून मधून आम्ही एकत्र जमतो. चहापान, सहभोजन इ० कार्यक्रम आमच्या गावात बरेच झाले आहेत. याबद्दल सांगली जिल्ह्यातले पहिल्या नंबरचे गाव म्हणून आमच्या गावास १००० रुपये रोख व सुवर्णपदक बक्षीस मिळाले आहे. याशिवाय आणखी काही बक्षिसे आमच्या गावाला मिळाली आहेतच !

## गावाला मिळालेली बक्षिसे व प्रशस्तीपत्रे—

( १ ) अस्पृश्यता निवारण—जिल्ह्यांत पहिला नंबर. एक हजार रु. रोख व प्रशस्तीपत्र

( २ ) आदर्श गाव—तालुक्यात पहिला नंबर. पांचशे रु. रोख.

( ३ ) ,, ,, दुसरा. अडीचशे रु. रोख.

( ४ ) विठ्ठलराव यादव सरपंच—आदर्श सरपंच कार्यकर्ता. प्रशस्तीपत्र व सुवर्णपदक.

**भावी कार्यक्रम:**-इतके बोलणे झाल्यावर मी म्हणालो," दादा ! गावच्या विकासाबाबत तुम्ही अगदी शिखर गाठलेले दिसते. " लागलीच दादा म्हणाले, " कोठले शिखर साहेब ! दिल्ली तो बहुत दूर है ! अजून पुष्कळ गोष्टी आम्हांला करावयाच्या आहेत " आणि दादांनी आपल्या गावच्या विकासासाठी योजलेल्या भावी कार्यक्रमाची यादीच वाचली.

१ प्रायमरी हेल्थ सेंटर, मंजूर झाले आहे. २ मध्यवर्ती बँक शाखा. ३ आर्ट-सायन्स-कॉमर्स कॉलेज. ४ संडास. ५ कुक्कुटपालन योजना. ६

सामुदायिक शेती इत्यादी गोष्टी गावच्या सुखसोयीत भर घालणाऱ्या आहेत, आणि लौकरच त्या करावयाच्या असा आमच्या मंडळींचा निश्चय आहे.

हे सर्व पाहिल्यावर आणि ऐकल्यावर केवढी प्रचंड जागृति समाजात झाली आहे, आणि राष्ट्रपिता महात्मा गांधींचे ग्रामराज्याचे स्वप्न पंचायत राज्याच्या रूपाने कसे साकार होत आहे हे पाहून एक प्रकारचा अननुभूत असा आनंद प्राप्त झाल्याशिवाय रहात नाही.

## थोरांचा आशीर्वाद

निरोप घेताना मी म्हणालो, "दादा ! आपल्या गावची विकासाची वाटचाल खरोखरीच अभिनंदनीय व कोणालाही अभिमान वाटण्यासारखी आहे. या दृष्टीने आपल्या गावच्या कार्याचा लौकिक ऐकून काही थोर मंडळी येथे येऊन समाधान मानून गेली असतीलच !" त्यावर दादा म्हणाले, "हो तर ! दे. भ. शंकरराव देव, दे. भ. अण्णासाहेब दास्ताने, दे. भ. अप्पासाहेब पटवर्धन, नामदार यशवंतराव चव्हाण, नामदार बाळासाहेब देसाई, नामदार आबासाहेब खेडकर, नामदार मधुकरराव चौधरी, श्रीमंत सरस्वतीबाई पटवर्धन राणीसाहेब सांगली, दे. भ. दुर्गाबाई देशमुख या मंडळींनी आमच्या गावाला भेट देऊन योग्य मार्गदर्शन केले आहे. आम्हांला उत्तेजन दिले आहे. म्हणून तर आम्ही गावकरी मंडळी एवढी वाटचाल करू शकलो."

शेवटी बावचीचे शिल्पकार दे. भ. दादा, विठ्ठलराव यादव आणि त्यांचे सहकारी मित्र यांच्या कार्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन आणि त्यांचा भावी कार्यक्रमही यशस्वी करण्याबद्दल परमेश्वराजवळ प्रार्थना करून मोठ्या समाधानाने मी निरोप घेतला.

…रक्षणाच

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय

REFBK-0013778